रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १७०
www.ramprahar.com

◆ मंगळवार, ६ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

बागमांडला समुद्र किनाऱ्यावर आढळले ग्रीन सी कासव/२
झेडपीसाठी जोमाने कामाला लागा -खासदार पाटील/५
रायगडच्या मुलींचा सुपर लीगमध्ये प्रवेश/८

## बांगलादेशमध्ये हिंदूंचे हत्यासत्र सुरूच; महिलेवर बलात्कार




**ढाका :** बांगलादेशमध्ये राजकीय अस्थिरतेदरम्यान अल्पसंख्याक हिंदूंवर सुरू झालेले हल्ल्यांचे सत्र थांबायला तयार नाही. हिंदूंवर हल्ला करून त्यांना ठार करण्याची तिसऱ्या आठवड्यातील पाचवी घटना घडली आहे. बांगलादेशमधील जेसोर जिल्ह्यात सोमवारी सायंकाळी एका हिंदू तरुणाची सार्वजनिक ठिकाणी गोळ्या घालून हत्या करण्यात आली. पत्रकार आणि ब्लिट्झचे संपादक सलाह उद्दीन शोएब चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार मृत तरुणाचे नाव राणा प्रताप बैरागी असे आहे. जेसोर जिल्ह्यातील मोनिरामपूर उपजिल्हा येथील कोपलिया बाजारातील सार्वजनिक ठिकाणी त्याच्यावर गोळीबार करण्यात आला. दुसरीकडे झेनैदाह जिल्ह्यात हिंदू विधवेवर दोघांनी सामूहिक बलात्कार केला. नंतर तिचे केस कापून झाडाला बांधून मारहाण करण्यात आली. पीडित महिलेवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# पनवेल मनपा रणधुमाळीत भाजपकडे वाढता ओघ

## शेकाप महिला आघाडीच्या नेत्या दीक्षा जाधव समर्थकांसह भाजपमध्ये



**तळोजा : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत तळोजा फेज-२ येथील सामाजिक कार्यकर्त्या आणि शेकाप महिला आघाडीच्या रायगड जिल्हा उपाध्यक्ष दीक्षा दिलीप जाधव यांनी अनेक महिला व पुरुष कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यामुळे शेकापला आणखी एक धक्का बसला आहे.

लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आणि त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा तळोजा फेज २ येथे झाला. या सोहळ्यास महंत जितेंद्र महाराज, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, वासुदेव घरत, वसंतराव नाईक, भाजप पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, नंदकुमार म्हात्रे, माजी सरपंच नितीन भोईर, छगन राठोड, उमेश कुंभार, हरेश पवार, अशोक शेडगे, विजय मालवे, सुधीर राठोड, अरुण राठोड, अशोक वीरकर, रूपेश चव्हाण, सुनील गाडेकर यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात मान्यवरांनी दीक्षा फाऊंडेशनच्या अध्यक्ष दीक्षा जाधव यांचे भाजपमध्ये स्वागत करत त्यांच्या सामाजिक कार्याचा उल्लेख केला, तर मनोगतात जाधव यांनी सांगितले की, तळोजा व पनवेल परिसरात होत असलेल्या विकासकामांमुळे प्रेरित होऊन मी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. समाजकारण व विकासाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी भाजपच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करेन.

दीक्षा जाधव व समर्थकांच्या पक्षप्रवेशामुळे तळोजा परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद वाढली असून महापालिका निवडणुकीमध्ये याचा निश्चित सकारात्मक परिणाम होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

### वेगाने विकास, गतिमान वाटचाल -आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, जगातील सर्वाधिक सदस्यसंख्या असलेला भारतीय जनता पक्ष देशाच्या विकासाचा मजबूत आधारस्तंभ आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वाखाली देश व राज्याने झपाट्याने विकासाची वाटचाल केली आहे. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास हे घोषवाक्य केवळ शब्दांत न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरले आहे. विविध लोककल्याणकारी योजना समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्यात आल्या आहेत. महाविकास आघाडीच्या काळात ज्या विकासापासून जनता वंचित राहिली होती, तो विकास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा गतिमान झाला आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे राज्याने विकासाची नवी उंची गाठली आहे. अशा विकासाभिमुख विचारधारेत सहभागी झाल्याबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. तुम्हाला पक्षात सन्मान आणि काम करण्याची योग्य संधी देण्यात येईल.



## काँग्रेस नेत्या माया अहिरेंच्या हाती ‘कमळ’

### शेकापचे योगेश देसाई, अमोल जाधवांचाही पक्षप्रवेश





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका निवडणुकीमध्ये सर्वच्या सर्व जागा विजयी मिळवण्याचा दृष्टिकोन समोर ठेवून आपण निवडणूक लढवत आहोत. मतदारांचा मिळणारा प्रतिसाद पाहता आपले सर्व उमेदवार भरघोस मतांनी विजयी होतील, असा विश्वास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कामोठे येथे काँग्रेस आणि शेकाप पदाधिकाऱ्यांच्या पक्षप्रवेशावेळी व्यक्त केला.

भाजपच्या माध्यमातून पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये अनेक विकासाची कामे मार्गी लागली असून नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सुविधा मिळत आहेत. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या या विकासकामांवर प्रभावित होऊन विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत. याच अनुषंगाने कामोठ्यातील काँग्रेसच्या नेत्या माया अहिरे तसेच शेकापचे योगेश देसाई, अमोल जाधव यांच्यासह अनेकांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्व प्रवेशकर्त्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पक्षाची शाल देऊन भाजपमध्ये स्वागत केले.

आपली महायुती ही खऱ्या अर्थाने महा आहे. आपण जात, पात, धर्म न मानता सर्वांना सोबत घेऊन काम करतो, असे या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले.

या कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, प्रभाग क्रमांक ११चे उमेदवार हॅप्पी सिंग, प्रदीप भगत, नीलम मोहिते, भाजपचे हर्षवर्धन पाटील, मयूर मोहिते, हरजिंदर कौर सिंग, ज्योती रायबोले, फातिमा आलम, सचिन गायकवाड यांच्यासह इतर पदधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## उद्धव ठाकरे बिनविरोध आमदार, आधी त्यांनी राजीनामा द्यावा!

### भाजप नेते आशिष शेलार यांचे प्रत्युत्तर



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात महापालिका निवडणुकीमध्ये महायुतीचे ६८ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. त्यानंतर विरोधकांकडून गंभीर आरोप करण्यात आले. उद्धव ठाकरेंनीही बिनविरोध निवडणुकीवर टीका केली होती. त्यावर भाजप नेते व मंत्री आशिष शेलार यांनी, उद्धव ठाकरे बिनविरोध आमदार आहेत. त्यामुळे आधी त्यांनी राजीनामा द्यावा, असा पलटवार केला.

एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात भाजप नेते ना. शेलार यांनी विविध मुद्द्यांवर भूमिका मांडली. ते म्हणाले, अर्ज भरणे, छाननी, माघार, चिन्हे वाटप ही सर्व कायदेशीर प्रक्रिया आहे. यापेक्षा काही वेगळे झाले असेल तर कोर्ट आहे, पण काही करायचे नाही, दाबून खोटे बोलायचे असे विरोधकांचे उद्योग सुरू आहेत. १४ मे २०२० रोजी उद्धव ठाकरे कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते, पण ते विधान परिषदेवर बिनविरोध निवडून गेले. स्वत: निवडून आले तेव्हा लोकशाही धोक्यात नाही, मात्र नगरसेवक निवडून आल्यावर चालत नाही. उद्धव ठाकरेंनी आमदारकीचा राजीनामा द्यावा.

## अलिबाग दरोडाप्रकरणी सात आरोपी अटकेत

**अलिबाग : प्रतिनिधी**

कुकूच-कु कंपनीचे मालक कुणाल पाथरे यांच्या अलिबाग तालुक्यातील मापगाव येथील घरावरील दरोडाप्रकरणी पोलिसांनी २४ तासांच्या आत सात जणांना अटक केली. या आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली आहे.

कुणाल पाथरे यांच्या घरावर हा दरोडा टाकण्यात आला होता. दरोड्यात चोरट्यांनी सुमारे १५ लाख रुपयांचा ऐवज लुटून नेला. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरोड्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे विभागाचे विशेष तपास पथक तयार करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. कल्याण आणि भिवंडी या भागात जाऊन पोलीस पथकांनी सात आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी दरोड्याची कबुली दिली आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## कामोठे परिसरात भाजप महायुती भक्कम -लोकनेते रामशेठ ठाकूर

### प्रभाग १३मधील चारही उमेदवारांच्या विजयाचा विश्वास

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे परिसरात भाजप महायुतीची ताकद भक्कम असून येणाऱ्या पनवेल महानगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडीची हवा आधीच गुल झाली आहे. विकासाचा दृष्टिकोन घेऊन अनेक विकासाची कामे भाजपकडून झाली आहेत. त्यामुळे प्रभाग क्रमांक १३मधील महायुतीचे चारही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास महापालिका निवडणूक प्रभारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला.



पनवेल महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत कामोठे परिसरात भाजप महायुतीच्या उमेदवारांचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे. भाजप महायुतीच्या नेतृत्वाखाली झालेल्या चौफेर विकासकामांमुळे महायुतीला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विकासाच्या मुद्द्यावर भाजपने केलेल्या कामांची दखल मतदार घेत असून त्याचा थेट फायदा महायुतीच्या उमेदवारांना होत आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कामोठे येथील मानसरोवर कॉम्प्लेक्स परिसरात प्रभाग क्रमांक १३मधील उमेदवारांच्या समर्थनार्थ प्रचार केला. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) या महायुतीच्या घटक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी प्रभाग क्रमांक १३मधील महायुतीचे उमेदवार रवींद्र गणपत जोशी, विकास नारायण घरत, हेमलता रवी गोवारी आणि शिला भाऊ भगत यांनी घरोघरी भेटी देत मतदारांशी संवाद साधला आणि महायुतीला विजयी करण्याचे आवाहन केले. या प्रचारावेळी ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, के.के. म्हात्रे, राजेश म्हात्रे, श्रावण घरत, रवी गोवारी यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## भाजप नेते नारायण राणेंना भोवळ

**चिपळूण : प्रतिनिधी**

भाजप नेते, खासदार नारायण राणे यांना सोमवारी (दि. ५) चिपूळणमधील कृषी महोत्सवात भोवळ आली. त्यामुळे सर्वांची एकच धावपळ उडाली. यानंतर काही मिनिटांनी सावरत ते गेस्ट हाऊसकडे रवाना झाले.

खासदार राणे भाषण करीत असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. त्यांचा आवाज बसला तसेच त्यांना चक्कर येत असल्याचे जाणवले. यानंतर त्यांनी आपले भाषण थांबवले. या वेळी जवळच असलेले कार्यकर्ते आणि सुरक्षा रक्षकांनी त्यांना आधार दिला तसेच खुर्चीत बसवले.

व्यासपीठावर भाजप नेते रावसाहेब दानवे, बबनराव लोणीकर, कैलास गोरंट्याल, नारायण कुचे, भास्कर दानवे, संतोष दानवे उपस्थित होते. या घटनेनंतर खासदार राणे गेस्ट हाऊसकडे रवाना झाले. त्यांची प्रकृती स्थिर आहे. तरीही डॉक्टरांनी त्यांना विश्रांतीचा सल्ला दिल्याचे समजते.

## गुळसुंदे परिसरात विकासकामांचा धडाका

### आमदार महेश बालदी यांच्या हस्ते लोकार्पण व भूमिपूजन




**रसायनी : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या निधीतून तसेच माध्यमातून गुळसुंदे ग्रामपंचायत परिसरात विविध विकासाची कामे करण्यात आली आहेत. या कामांचे लोकार्पण आणि नव्या कामाचे भूमिपूजन आमदार महेश बालदी यांच्याच हस्ते रविवारी (दि. ४) झाले.

गुळसुंदे येथे दशक्रिया विधी परिसर सुशोभिकरण करणे, गजानन महाराज मंदिर सभामंडप बांधणे, राजवाडा नगर येथे अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण, पलाटवाडी येथे अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण आणि चिंचेचीवाडी येथे अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे अशी कामे पूर्णत्वास आली आहेत. या सर्व कामांचे लोकार्पण आणि आकुलवाडी येथे साकव बांधणे या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. त्याचप्रमाणे या वेळी आदिवासी विकास अंतर्गत न्यूक्लिअस बजेट अंतर्गत मच्छीमार होड्या व जाळे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमांना भाजप पनवेल दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी जि.प. सदस्य राजू पाटील, गुळसुंदे विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, वावेघर पंचायत समिती अध्यक्ष प्रतिक भोईर, पळस्पे विभागीय अध्यक्ष सुनील गवंडी, राम गाताडे, महादेव कांबळे, संदीप पाटील, चंद्रकांत भोईर, आर. डी. पाटील, शांताराम मालुसरे, मनोज पवार, प्रमोद विद्वांस, मिनेश गाडगीळ, सुरेश जोशी, महादेव कावडे, बजरंग भागवत, विनायक भोईर, रमेश मालुसरे, जितेंद्र गाताडे, अजिंक्य सुर्वे, संतोष चौलकर, सतीश साठे, स्वप्नील चौलकर, जितेंद्र पाटील, मिनाक्षी जगताप-पाटील, अर्पणा चौलकर, काव्या जोशी, रूपेश चव्हाण, प्रशांत पाटील, अनिल सावंत, यशवंत जाधव, दीपक पारंगे, हर्षल जोशी, प्रथमेश पाटील, राजेश साठे, सुनील पालकर, चिंतामण गायकवाड, अंकित मालुसरे, बाळाजी गरूडे यांच्यासह कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विकासकामांबद्दल आमदार महेश बालदी यांचे आभार मानण्यात आले.



# तळा नगरपंचायतीची इमारत शहराच्या वैभवात भर घालणारी ठरेल -अजित पवार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

नगरपंचायतीची प्रस्तावित प्रशासकीय इमारत ही तळा शहराच्या वैभवात भर घालणारी, दर्जेदार आणि भविष्याचा विचार करून उभारण्यात येईल तसेच या प्रशासकीय इमारतीमुळे नागरिकांना एकाच छताखाली विविध सेवा-सुविधा उपलब्ध होणार असून प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होणार आहे असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. नागरी सेवा व सुविधा योजनेंतर्गत तळा नगरपंचायतीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचा भूमिपूजन सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते तळा येथे संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष श्रीमती माधुरी घोलप,उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, नगरपंचायत सदस्य-सदस्या,



जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ही भूमी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली असून ऐतिहासिक वारसा लाभलेल्या तळा तालुक्याला विशेष महत्त्व आहे. तळागड किल्ला हा मराठा साम्राज्याच्या काळात टेहळणी व संरक्षणाचे महत्त्वाचे केंद्र होते. या ऐतिहासिक साक्षीने नटलेला तळा परिसर आज हिरवीगार शेती, निसर्गसौंदर्य आणि सर्वांच्या प्रयत्नांमुळे विकासाच्या नव्या वाटेवर वाटचाल करत आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी आणि पालघरपर्यंत पसरलेले निसर्गसौंदर्य, समुद्रकिनारे, घनदाट हिरवी झाडी व पावसाळ्यातील धबधबे यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत.

तळा नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी शासनाकडून ८.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी ५० टक्के निधी वितरित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. उभारण्यात येणारी प्रशासकीय इमारत अत्यंत उत्कृष्ट दर्जाची असावी व नागरिकांची कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अशा सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. ग्रामदैवत आई चंडिका माता मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या ,उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून तळा तालुक्यातील पुसाटी गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी सुमारे ८५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच, तळागड किल्ल्याचा ताबा केंद्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाकडून महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे घेऊन गड विकासाचा मार्ग मोकळा करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# निवडणुकीसाठी जबाबदारीने कार्यरत रहावे -कैलास पगारे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका भयमुक्त, निष्पक्ष व शांततेत होण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने कार्यरत रहावे अशा सूचना मुख्य निवडणूक निरीक्षक कैलास पगारे (भाप्रसे) यांनी सोमवारी (दि.५) दिल्या. निवडणूक संदर्भात आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सर्व संबधित विभागांची आढावा बैठक घेण्यात आली. त्या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या वेळी निवडणूक निरीक्षक मनिषा कुंभार, निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे, आयकर कर शुल्क विभागाचे सहआयुक्त डॉ. अमित मुंडे (आयआरएस), पोलीस उपायुक्त परिमंडळ २ प्रशांत मोहिते, पोलीस आयुक्त वाहतूक तिरूपती काकडे, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे,



अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे आदी उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना मुख्य निवडणूक निरीक्षक कैलास पगारे म्हणाले, पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांचा पहिला टप्पा यशस्वीपणे पुर्ण झाला असून योग्य पध्दतीने सगळी तयारी झाली आहे. तरीही ऐनवेळी येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी सर्व तयारीची उजळणी करण्याच्या सूचना मुख्य निवडणूक निरीक्षक कैलास पगारे (भाप्रसे) यांनी उपस्थित सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच सर्वांनी प्रशिक्षण, मतदान यादी, पोलीस संरक्षण, मतदान केंद्रावरील साहित्य वाटप, अशा सर्व गोष्टीची पडताळणी करावी असे सांगितले.या वेळी सहाय्यक पोलिस आयुक्त विक्रम कदम, सहाय्यक पोलिस आयुक्त भाऊसाहेब ढोले, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षकसर्व निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

## गौळवाडी माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना रोपवाटिका बनविण्याचे प्रशिक्षण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या गौळवाडी माध्यमिक विद्यालयामध्ये वन विभाग यांच्या माध्यमातून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना रोपवाटिका बनविण्याचे प्रशिक्षण सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी दिले.

सामाजिक वनीकरण विभाग वनपरिक्षेत्र कर्जत यांचे माध्यमातून कर्जत तालुक्यातील गौळवाडी माध्यमिक विद्यालयात हरित सेना' या उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक वनीकरण कडून विविध शाळांमधे निसर्ग आणि पर्यावरण पुरक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गौळवाडी माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना रोपवाटीका बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी वनक्षेत्रपाल मिलिंद राऊत,माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गलगले हे उपस्थित होते. उपक्रमांसाठी सामाजिक वनीकरण विभाग कर्जन कडून वनक्षेत्रपाल मिलिंद राऊन, वनपाल,लांगी, प्रशांत महानूनी आणि वनरक्षक निकम, शितल साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना रोपवाटिका बनविण्यासाठी मार्गदर्शन केले आणि शाळेच्या एका भागात रोपवाटिका बनवून दिली. कर्जत येथील अभिनव शाळेच्या विद्यार्थ्यांनी देखील रोपवाटिका बनविण्याचा कामात सहभाग घेतला

हरित सेनेच्या माध्यमातून निबंध स्पर्धा, एक पेड माँ के नाम, प्लास्टीक मुक्त परिसर आदी उपक्रम राबविले जात आहेत. तसेच घनकचरा व्यवस्थापन, आईच्या नावाने एक झाड, एक निरोगी वनस्पती लावण्यासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात आला.



# 'एसटीच्या ताफ्यात आठ हजार नवीन बसेस वर्षाअखेरपर्यंत दाखल करा'

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

सन २०२६ अखेर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात ८ हजार नवीन बसेस दाखल होतील अशा पद्धतीने सध्या सुरू असलेली निविदा प्रक्रिया तातडीने गतिमान करण्यात यावी. यामध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा सज्जड दम परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष मा. प्रताप सरनाईक यांनी दिला.

एसटी महामंडळाच्या सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय निधीच्या वापराबाबत बोलावलेल्या आढावा बैठकीत बोलत होते. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, आर्थिक सल्लागार गिरीश देशमुख तसेच संबंधित खातेप्रमुख उपस्थित होते. यावेळी मंत्री सरनाईक यांनी एसटीच्या विविध विभागांकडून सुरू असलेल्या संथ व कूर्मगती कारभारावर तीव्र



नाराजी व्यक्त केली.

ते म्हणाले की, सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात एसटीसाठी शासनाने २४६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र आर्थिक वर्ष संपण्यास अवघे तीन महिने शिल्लक असताना त्यापैकी सुमारे १६०० कोटी रुपये खर्चाविना परत जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. हा निधी सर्वसामान्य जनतेच्या करातून आलेला असून तो प्रवाशांच्या मूलभूत सुविधा - नवीन बसेस खरेदी, बसस्थानकांची उभारणी, दुरुस्ती व नूतनीकरण यासाठी वापरणे अपेक्षित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परंतु बसेस खरेदी व बसस्थानकांच्या कामांच्या निविदा प्रक्रिया गेल्या नऊ महिन्यांपासून रेंगाळल्यामुळे निधी खर्च होऊ शकलेला नाही, याला संबंधित विभागांचे अकार्यक्षम अधिकारी जबाबदार असल्याचा ठपका त्यांनी ठेवला.

उर्वरित तीन महिन्यांत जास्तीत जास्त निधी खर्च करून प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा - नवीन बसेस, बसस्थानके, प्रसाधनगृहे आदींच्या निर्मितीसाठी आवश्यक निविदा व प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रकल्पांना गती देण्याचे स्पष्ट निर्देश यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. प्रशासनाने जबाबदारीने काम करावे, असेही त्यांनी ठामपणे नमूद केले.

## नमुंमपा सार्वत्रिक निवडणुकीनिमित्त मतदारांना १५ जानेवारीला सुट्टी जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे दि. १५ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार असून सदर निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रितीने बजावता यावा, तसेच महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगतच्या जिल्ह्यामधील सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रीतीने बजावता यावा यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने शासन परिपत्रक जारी केले आहे

तरी सदर शासन परिपत्रकाची नोंद घेऊन नवी मुंबईतील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने यांनी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १८ वर्षावरील मतदार नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांना १५ जानेवारी २०२६ रोजी होणा-या नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी द्यावी किंवा अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत देण्यात यावी असे सूचित करण्यात येत आहे.

## रायगडात पंचायतराज अभियानात ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची रायगड जिल्हा परिषदेतर्फे (राजिप) संपूर्ण रायगड जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. पंचायतराज अभियानात ग्रामस्थ उत्स्फूर्त सहभाग घेत आहेत.या अभियानाला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण विकासाची गती वाढवणे, योजना प्रभावीपणे राबविणे आणि ग्रामपंचायतींची प्रशासनिक क्षमता अधिक सक्षम बनविणे हा आहे. भेटीदरम्यान पथकाने ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती घेतली तसेच नागरिकांच्या गरजा, उपलब्ध सुविधा आणि आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेतला.

या अभियानांतर्गत पथकाने जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींना भेटी दिल्या. ग्रामपंचायतीमार्फत स्वच्छता, सीसीटीव्ही, कचऱ्याचे योग्य नियोजन, स्वच्छ पाणी पुरवठा, महिलांच्या आर्थिक स्वावलंबन व सक्षमीकरणाला बळ यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचप्रमाणे ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली.

**उद्देश**

- ग्रामपंचायतीची प्रशासनिक क्षमता वाढविणे
- विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी
- सर्वांगीण ग्रामीण विकासाला चालना
- स्थानिक महसूल व आर्थिक स्त्रोतांची मजबुती
- ग्रामसभांच्या माध्यमातून नागरिकांचा वाढता सहभाग
- डिजिटल प्रशासन व ई-गव्हर्नन्सचा वापर
- पर्यावरणपूरक व शाश्वत विकास उपक्रमांची अंमलबजावणी
- पारदर्शी, उत्तरदायी आणि लोकाभिमुख स्थानिक शासन

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविले जात असून या अभियानाला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींसह सर्व ग्रामस्थांनीही एकत्र येऊन अजून जिद्दीने काम करून राज्यात रायगड जिल्ह्याला प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल यासाठी प्रयत्न करूया.**
**-नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप**

## महिला बचत गट सदस्यांना एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा

**रोहा : रामप्रहर वृत्त**

ई-मार्केट प्लॅटफॉर्मवर ग्रामीण उत्पादनांची विक्री करण्यासाठी महिला बचत गट सदस्यांची क्षमता बांधणी या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा दिनांक ०५ जानेवारी रोजी रोहा पंचायत समिती हॉल, येथे आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळा जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, रायगड जिल्हा परिषद व प्रायमू, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली.

कार्यशाळेस जिल्हा व्यवस्थापक (मार्केटिंग) सिद्धेश राऊळ, डिजिटल मार्केटिंग एक्सपर्ट सागर सावंत (प्रायमू, पुणे), विभागीय समन्वयक विक्रांत सोहनी (कोकण विभाग, प्रायमू) तसेच प्रभाग समन्वयक मिताली तांडेल (रोहा) उपस्थित होते.



रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून आलेल्या महिला उद्योजिकांनी आणलेल्या विविध उत्पादनांची पाहणी करून ई-मार्केट प्लॅटफॉर्मसाठी ऑनबोर्डिंगसंदर्भातील योग्य नोंदणी फॉर्म भरून घेण्यात आले.

सागर सावंत यांनी लेबलिंग, पॅकेजिंग व ऑनबोर्डिंग प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन करून महिलांच्या प्रश्नांचे समाधान केले. विक्रांत सोहनी यांनी उमेद मार्ट ॲप ओरिएंटेशन व प्राईस स्ट्रॅटेजी याबाबत मार्गदर्शन केले, तर जिल्हा व्यवस्थापकांनी उत्पादन विकास व जिल्हा मार्ट संकल्पना सविस्तरपणे समजावून सांगितली. पनवेल येथील उद्योजिका विद्या बागवे यांनी आपले अनुभव कथन केले. सदर कार्यशाळेत रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांतील एकूण ४५ महिलांनी सहभाग नोंदवला कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न झाली.

## बागमांडला समुद्र किनाऱ्यावर ग्रीन सी कासव आढळले

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बागमांडला, श्रीवर्धन येथे फेरीबोटीच्या नवीन जेट्टीच्या एका बाजूला चिखलांवर एक मोठं कासव वाहून आले आहे असा तिथे काम करणाऱ्या आकाश पाडलेकर रा.वेळास यांनी वनविभाग कांदळवन कक्ष दक्षिण कोकण यांचे कार्यालयास संपर्क केला असता वनरक्षक, कासव तज्ञ, कासव मित्र यांनी घटनास्थळी प्रत्यक्षदर्शी जाऊन पाहिले असता ते ग्रीन सीटर्टल (Green Sea Turtle) या प्रजातीचे नरकासव आहे असे लक्षात आले.

रायगड जिल्ह्यात सागरी क्षेत्रात सागरी कासवांच्या पाच प्रजाती आढळतात त्या अनुषंगाने या प्रजातीचा त्यात समावेश आहे परंतु आज मौजे बागमांडला, श्रीवर्धन येथे प्रथमच नर ग्रीन सी कासव वाहून आल्याचे कांदळवन प्रतिष्ठानचे



सहाय्यक संशोधक मोहन उपाध्ये यांच्या निदर्शनास आले. अंदाजे २०० किलो वजनाचे हे ग्रीन सीटर्टल त्याची लांबी (डोकंतेशेपटी ) १९० सेंमी, (६ फूट ३ इंच) पाठीची लांबी ६५ सेंमी, (२.११ फुट ) रुंदी ६२.५सेंमी, (२ फुट) शेपटी ३६ सेंमी आहे.

पाण्याला ओहोटी लागल्यामुळे ते किनाऱ्यावर वाहून आले असावे. वन कर्मचारी यांनी कासवाची तपासणी केली असता, त्याला कुठेही दुखापत झाल्याचे आढळून आले नाही. मारळ येथील जयंत कानडे, संकेत मयेकर व हरिहरेश्वर येथील संतोष मयेकर, सुबोध खोपटकर कासव मित्र आणि कांदळवन विभागाचे अधिनस्त वनरक्षक तुषार बाप्पासाहेब भटे व ऋषिकेश विश्वास लव्हटे तसेच कासव तज्ञ मोहन उपाध्ये तसेच तेथील काही स्थानिक ग्रामस्थ आणि फेरी बोटीवर काम करणाऱ्या मुलांच्या साहाय्याने त्या कासवाला नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.

## राजिप उतेखोल शाळेला रामनारायण मिश्रांकडून वॉटर फिल्टर भेट



**माणगाव : प्रतिनिधी**


विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच स्वच्छ व शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद उतेखोल शाळेला शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ रोजी क्रातीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून रामनारायण मिश्रा यांच्याहस्ते आधूनिक ब्लू स्टार वॉटर फिल्टर शाळेला भेट देण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रामनारायण मिश्रा,माणगाव तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट तसेच उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे,सायली अंबुर्ले,अस्मिता खडतर शाळा व्यवस्थापन कमिटीच्या अध्यक्षा संतोषी प्रजापती,उपाध्यक्ष दिनेश पोवार,सदस्या आस्मा माटवणकर,नंदिनी वाढवळ,मयुरी भिलारे,आसावरी पोवार,सुरेखा भला उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सामाजिक कार्यकर्ते रामनारायण मिश्रा यांनी प्रत्येकाने आयुष्यात पुढे जाण्यासाठी आणि यश मिळविण्यासाठी शिक्षण घेणे आवश्यक असल्याचे पटवून दिले. माणगाव तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबटआणि केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी सावित्रिबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्यावर, समाज आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले.

**दुखवटा**

### द्रौपदी ठोंबरे



**मोहोपाडा :** खालापूर तालुक्यातील चौक जांभिवलीच्या द्रौपदी ठोंबरे (वय ८५) यांचे जांभिवली चौक गावी राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात नातू गजानन आंबो माळी, प्रमोद कांता मुंढे, कृष्णा बाळाराम गावडे, विवाहित चार मुली जावई व नाती असा मोठा परिवार त्यांच्या मागे आहे. कै. द्रौपदी यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि.७) तीर्थक्षेत्र उद्धर रामेश्वर येथे धार्मिक रिती रिवाजानुसार होणार आहे. उत्तर कार्य तेरावे शनिवारी (दि.१०) जांभिवली येथे होणार आहे. तेराव्यानिमित्त हभप हरिभाऊमहाराज माळी यांचे श्रवणीय प्रवचन आयोजन केले आहे.

# भाजप महायुतीच्या प्रचाराला नागरिकांचा प्रतिसाद

## प्रभाग १९मध्ये डोअर टू डोअर भेटीगाठींना प्राधान्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची निवडणूक दिवसेंदिवस अधिक रंगतदार होत असून सर्वच उमेदवारांनी आपापल्या प्रभागात जोरदार प्रचाराला सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १९ मध्ये भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसआरपीआय महायुतीच्या उमेदवारांनी रविवारच्या सुट्टीचा पुरेपूर उपयोग करत मतदारांशी थेट संवाद साधला. शहरातील वीरूपक्ष मंदिर ते सावरकर चौक या परिसरात महायुतीच्या उमेदवारांनी डोअर टू डोअर प्रचार करत नागरिकांच्या घरी जाऊन भेटीगाठी घेतल्या.



या वेळी नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसून आला. विशेष म्हणजे या प्रभागात याआधीच भाजप महायुतीच्या उमेदवार दर्शना भोईर व रुचिता लोंढे या बिनविरोध निवडून आल्यामुळे महायुतीची ताकद अधिक ठळकपणे समोर आली आहे. त्यामुळे आता प्रभाग १९ मध्ये महायुतीचे उमेदवार राजू सोनी व सुमित झुंजारराव हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या प्रचारादरम्यान मल्हार टीव्हीने उमेदवारांशी संवाद साधला. सुमित झुंजारराव यांनी सांगितले की, या प्रभागात गेल्या काही वर्षांत पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली आहेत. भाजपची संघटनात्मक ताकद येथे भक्कम असल्यानेच विरोधी पक्षांना सक्षम उमेदवार मिळणे कठीण गेले. आयत्यावेळी दिलेल्या उमेदवारीमुळे विरोधी पक्षातील दोन उमेदवारांनी अर्ज मागे घेतले.

माजी नगरसेवक राजू सोनी यांनीही सांगितले की, आम्हाला मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळतो आहे. गेल्या टर्ममध्ये पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आम्ही महापालिकेत एक संघ होऊन काम केले. त्या विकासकामांच्या जोरावरच आज आम्ही मतदारांपुढे जात आहोत. विरोधी पक्षाला माझ्यासमोर उमेदवार मिळाला नाही, त्यामुळे बाहेरचा आयात उमेदवार उभा करावा लागला; तरीही आम्ही गाफील न राहता जोरदार प्रचार करत आहोत. एकूणच पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९ मध्ये भारतीय जनता पार्टी आणि महायुतीची संघटनात्मक ताकद, विकासकामांचा ठसा आणि मतदारांचा वाढता विश्वास स्पष्टपणे दिसून येत असून, प्रभाग १९ मध्ये महायुतीचा विजय निश्चित असल्याचे चित्र मानल जात आहे.

## प्रभाग ११मध्ये जोरदार शक्तिप्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने प्रचारात मोठी आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक मतदारसंघामध्ये महायुतीच्या उमेदवारांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि भरघोस प्रेम मिळत असून, रविवारी प्रभाग क्रमांक ११ मध्ये महायुतीच्या उमेदवारांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले.



महायुतीचे अधिकृत उमेदवार हॅप्पी सिंग, प्रदीप गजानन भगत आणि नीलम मयूर मोहिते यांच्या प्रचारार्थ रविवारी प्रभागात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मप्रत्येक घरापर्यंत महायुतीचा विकासफहा नारा देत उमेदवारांनी मतदारांशी संवाद साधला. या प्रचारादरम्यान स्थानिक नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद पाहता महायुतीचे पारडे जड असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या प्रचारावेळी अमोल सय्यद, मयूर मोहिते, ज्योती रायबोले, ललिता इनकर, पंकज बाबर, पंढरीनाथ साळुंखे, कविता माने, अरुणा भगत, सुनील यंगर, सुयोग कारपे, तेजस इनकर, सतीश चाके, फातिमा आलम यांच्यासह महायुतीचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचारादरम्यान महिलांनी उमेदवारांचे औक्षण करून त्यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. प्रभागातील रखडलेले प्रश्न मार्गी लावणे आणि पायाभूत सुविधांचा दर्जा सुधारणे या मुद्द्यांवर भर देत उमेदवारांनी मतदारांना मतदानाचे आवाहन केले.

कामोठे शहराच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर गेल्या दोन दशकांपासून आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे नेतृत्व हॅप्पी सिंग यांनी भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्रभाग क्रमांक ११ मधून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. लोकांचे प्रेम हीच माझी शक्ती मानणाऱ्या हॅप्पी सिंग यांच्या उमेदवारीमुळे या प्रभागात आता प्रचाराचा धडाका सुरू झाला आहे.

हॅप्पी सिंग यांची ओळख एक लढाऊ कार्यकर्ता म्हणून आहे. कामोठेच्या भीषण पाणी प्रश्नासाठी त्यांनी सिडको प्रशासनाविरोधात दिलेला लढा ऐतिहासिक ठरला. जनतेच्या हक्कासाठी त्यांनी स्वतःवर पोलीस कारवाया झेलल्या, पण लोकांसाठी आवाज उठवणे कधीही थांबवले नाही.

आमदार प्रशांत दादा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य म्हणून प्रभावी काम केले आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून शेकडो रुग्णांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे पुण्यकर्म त्यांनी केले आहे.

## प्रभाग ६मध्ये थेट मतदारांशी संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ६ मध्ये भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआय महायुतीच्या उमेदवारांनी प्रचाराला वेग दिला आहे. महायुतीच्या वतीने उषा अडसुळे, ॲड. नरेश ठाकूर, सोनाली नवघरे आणि समीर कदम यांनी रविवारी खारघर येथील सेक्टर १० मध्ये घरोघरी जाऊन मतदारांशी थेट संवाद साधत प्रचार केला.



या प्रचारादरम्यान केंद्र सरकार, राज्य सरकार तसेच गेल्या पाच वर्षांत भाजपच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांची माहिती मतदारांना देण्यात आली. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, उद्याने, नागरी सुविधा आणि पायाभूत विकासकामांमुळे परिसराचा कायापालट झाला असून, याच विकासाच्या जोरावर भाजप महायुतीकडे नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या वेळी बोलताना महायुतीचे उमेदवार समीर कदम यांनी सांगितले की, केंद्र व राज्य सरकारच्या समन्वयातून आणि महापालिकेच्या माध्यमातून प्रभागात मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्यात आली आहेत. ही कामे प्रत्यक्षात दिसत असल्याने मतदारांमध्ये आमच्याबद्दल सकारात्मक भावना आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत मतदार भाजप महायुतीच्या उमेदवारांनाच पसंती देतील, असा आम्हाला ठाम विश्वास आहे.

दरम्यान, या प्रभागात सुशिक्षित आणि सक्षम चेहरा म्हणून भाजप महायुतीने पुन्हा एकदा ड. नरेश ठाकूर यांना संधी दिली आहे. याबाबत आपले मत व्यक्त करताना त्यांनी सांगितले, आम्ही सातत्याने घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधत आहोत. ज्या-ज्या ठिकाणी आम्ही जातो, तेथे नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गेल्या काही वर्षांत झालेली विकासकामे आम्ही पाहिली आहेत, त्यामुळे आमचा पूर्ण विश्वास तुमच्यावर आणि भाजप महायुतीवर आहे, असे मतदार ठामपणे सांगत आहेत. हा विश्वासच आमची खरी ताकद आहे.



**पनवेल : महापालिका प्रभाग २मधील पाले खुर्द गावात काजल महेश पाटील, अरुणा किरण दाभणे, दिनेश रवींद्र खानावकर, कृष्णा सीताराम पाटील या भाजप महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यात आला. या वेळी माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, तोंडरेचे माजी सरपंच नारायणशेठ पाटील, वासुदेव पाटील, अमृता पाटील, हरिश पाटील, श्रीनाथ पाटील, जयवंत पाटील, चंद्रकांत पाटील, अशोक साळुंखे, काळूराम फडके, अमृता पाटील आदी उपस्थित होते.**

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त गव्हाण ज्युनिअर कॉलेजमध्ये श्रमदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी शनिवारी (दि.३) श्रमदान करून अनोखे अभिवादन केले.

विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयांतर्गत श्रमप्रतिष्ठा या नीती मूल्याची सांगड घालून देत स्त्री शिक्षणाच्या उद्गात्या ज्ञानज्योती सावित्रीबाईंना अनोखे अभिवादन केलै.

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी वृक्ष संवर्धन, पर्यावरण रक्षण हे आपले कर्तव्य आहे हे समजून घेऊन वृक्षासभोवताली मातीची भर घालून बुंध्यांभोवती आळी केली. स्वतः प्राचार्यांनी खोदकाम करून झाडांना आळी तयार केली. संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांचीही उपस्थिती लाभली. पर्यावरण रक्षणात विद्यार्थ्यांचा कृती युक्त सहभाग घेतला.



## ग्रामपंचायत हद्दीतील कचरा दाखवून कारवाई करण्यासाठी पथकाची निर्मिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रामपंचायत हद्दीत रस्त्याच्या आजूबाजूला, नदी काठालगत टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यासंदर्भात पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. या पथकाने उघड्यावर टाकण्यात येणाऱ्या कचरा शोधून संबंधित ग्रामपंचायतीला लेखी सूचना पत्र देण्याचे आदेश गटविकास अधिकारी समीर वाठारकर, पनवेल पंचायत समिती यांनी दिले आहेत.

घनकचरा व्यवस्थापना करता तयार केलेले नियम, घनकचरा व्यवस्थापन नियमा अंतर्गत ग्रामपंचायतने ग्रामपंचायतीच्या हद्दीत घनकचरा आणि स्वच्छता विषयक पार पाडावयाची जबाबदारी निश्चित केलेली आहे. पनवेल तालुक्यात कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींमध्ये घनकचरा व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने होण्याकरता पनवेल पंचायत समिती मार्फत वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे. ७१ ग्रामपंचायत मधील निवासी औद्योगिक आणि वाणिज्यिक आस्थापनामधून तयार होणारा घनकचरा ग्रामपंचायतीमार्फत संकलित होत आहे. तरीही ग्रामपंचायत हद्दीमधील निवडक ठिकाणी म्हणजे रस्त्याच्या बाजूला, नदी काठा लगत, वनविभागाच्या हद्दीमध्ये ठीकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याचे निदर्शनास येत आहेत. हे कचऱ्याचे ढीग साचल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी पसरत आहे. त्याचा दुष्परिणाम म्हणजे ग्रामस्थांना भटके कुत्रे, मोकाट जनावरे आणि इतर आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पथकांची निर्मिती करण्यात आली आहे.

दत्तू हिंदोळा, ओमकार पाटील, प्रतीक पाटील यांना ३५ ग्रामपंचायती तर दिलीप झावरे, मनीषा साळवे, सायली म्हात्रे, दीप्तीश पाटील यांनी ३६ ग्रामपंचायती हद्दीतील पंचायतींवर भेट देऊन ज्या ठिकाणी उघड्यावर कचरा टाकला जातो त्या शोधून त्या दिवशी संबंधित ग्रामपंचायतीला लेखी सूचना पत्र देण्यासाठी सांगितले आहे. सूचनापत्रानुसार ग्रामपंचायतीला यावर कार्यवाही करणे गरजेचे आहे.

## वकील मंडळीही पनवेल महापालिका निवडणूक रिंगणात

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत कायद्याची पदवी घेतलेले आणि प्रत्यक्ष वकिली व्यवसाय करणारे तब्बल वकिल उमेदवार विविध प्रभागांतून निवडणूक रिंगणात उत्तरले आहेत. त्यामुळे भविष्यात पनवेल महापालिकेत कायदेशीर जाण असलल्या लोक प्रतिनिधींची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवली ग्राह्य जात आहे.

यंदाच्या निवडणुकीत पनवेल बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, ॲड. शिवानी घरत, ॲड. प्रकाश बिनेदार, ॲड. जयसिंग शेरे, ॲड. सिद्धार्थ सोनाजी इंगळे, ॲड. सुलक्षणा जगदाळे, ॲड. नरेश ठाकूर, ॲड. गीता सुशील चौधरी, ॲड. विणा पाटील, ॲड. तुषार पाटील, ॲड. प्रतिभा सुभाष भोईर, ॲड. समाधान काशीद, ॲड. संतोष गाडी, ॲड. सिद्धार्थ गावकर आणि ॲड. राहुल कासारे हे उमेदवार रिंगणात आहेत.

यंदा मतदार केवळ पक्षनिष्ठा न पाहता उमेदवाराची अभ्यासू मांडणी, प्रश्नांची समज, प्रशासनावरची पकड आणि कायदेशीर स्पष्टता या बाबींनाही महत्त्व देत आहेत. प्रचारात मांडले जाणारे युक्तिवाद आणि विकासाच्या ठोस योजना मतदारांवर कितपत प्रभाव टाकतात, याचा फैसला १६ जानेवारी रोजी निकालाच्या रूपाने समोर येणार आहे.



**पनवेल :** येथील महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाने महायुतीला आपला जाहीर पाठिंबा दिला आहे. स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकनचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट घेत महायुतीला पक्षाचा भक्कम पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. या भेटीदरम्यान स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे, प्रशांत सोनवणे, पनवेल शहराध्यक्ष समाधान कांबळे, मनोज कांबळे, चंद्रकांत वेळासकर, ममताज पठाण यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयांमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमावेळी सर्वप्रथम विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी एम.के. कोंगेरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन केले. या कार्यक्रम प्रसंगी विद्यालयातील पहिली ते पाचवीमधील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचा पेहराव केला होता. यामधील श्रेया शिंदे, किंजल हादवे, श्रेया आंधळे, सानवी आलदर, तन्वी शेकडे, प्रियल मदने, श्रेया कांबळे, स्वरा चौधरी, सोमेश्री चव्हाण, प्रांजल हादवे या विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांचा जीवन प्रवास, स्त्री शिक्षणासाठी केलेला त्याग आपल्या भाषणातून सांगितला.

या कार्यक्रमाचे निवेदन १० वी ब मधील विद्या गुंड हिने केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विद्यालयातील एस.डी. पाटील, संध्या कांबळे, मनीषा बोचरे, रेश्मा कांबळे, स्वराली भोईर, सविता पवार यांनी सहकार्य केले.



## ऑनलाईन कपडे खरेदी पडली महागात

**पनवेल : वार्ताहर**

वेबसाइटवरून ऑनलाईन ड्रेस मागवणे एका महिलेला चांगलेच महागात पडले आहे. पनवेलच्या करंजाडे भागात राहणाऱ्या या विवाहितेने ज्या ऑनलाईन साइटवरून ड्रेस खरेदी केले, त्या बोगस साइटवरील सायबरचोरांनी तिला फसवले. ड्रेस घेऊन निघालेल्या डिलीव्हरी बॉयचा अपघात झाल्याचे सांगून त्यांना पैसे परत पाठविण्याचा बहाणा करून या या महिलेकडून एक लाख ३२ हजार रुपये उकळण्यात आले. पनवेल पोलीस या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

महिला इन्स्टाग्रामवरील रिल्स बघत असताना, आयेशा क्रिएशनच्या पेजवर स्वस्तात कपडे विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे तिने पाहिले. जाहिरातीत दिलेल्या क्रमांकावर या महिलेने संपर्क साधला असता तीन हजार ६०० रुपयांत शिलाईसह दोन ड्रेस मिळतील येईल असे सांगण्यात आले. त्यामुळे या विवाहितेच्या पतीने ड्रेस खरेदी करण्यासाठी पाठवण्यात आलेल्या स्कॅनरवर तीन हजार ६०० निघालेल्या डिलीव्हरी बॉयचा अपघात झाल्याचा रुपये पाठवून दिले, मात्र त्यांचे ड्रेस घेऊन मेसेज पाठवून सायबर चोरांनी त्यांची रक्कम परत करण्याचा बहाणा केला. तसेच गुगल पेवर रिक्वेस्ट स्विकारण्यास सांगितले, त्यानुसार या महिलेच्या पतीने ही रिक्वेस्ट स्वीकारल्यानंतर त्यांना पैसे तर आले नाहीच, उलट पतीच्या खात्यातून ९३ हजार रुपये गेले. त्यानंतर आयेशा क्रिएशनचे मालक असल्याचे भासवून आणखी एकाने या महिलेशी संपर्क साधला.

मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे कारण सांगून त्यांचे ९६ असल्याचे सांगितले. तसेच त्यांना आणखी ३० हजार रुपये परत पाठविण्यास अडचण येत हजार रुपये पाठवण्यास सांगितले. त्यानुसार ३० हजार रुपये पाठविल्यानंतर आणखी ५,२९८ रुपये पाठविल्यास त्यांची सर्व रक्कम परत येईल असे सांगण्यात आले. ही रक्कम पाठविण्यात आल्यानंतरही आणखी रक्कम पाठविण्यास सांगण्यात येऊ लागले. त्यानंतर त्यांनी पनवेल पोलीस ठाण्यात तक्रार केली.

## संपादकीय

# निषेधार्ह हल्ला

अमेरिकेतील ट्रम्प प्रशासनाकडून झालेले व्हेनेझ्युएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांचे अपहरण आंतरराष्ट्रीय कायदे आणि संकेतांचा भंग करणारे आहे अशीच प्रतिक्रिया सर्व महत्त्वाच्या देशांकडून उमटली आहे. भारतानेही या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे.

**व्हेनेझ्युएलाची राजधानी कराकासमध्ये शनिवारी ३ जानेवारी रोजी सकाळी झालेल्या स्फोटानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हे हल्ले अमेरिकेने केल्याचे सांगितले. तसेच व्हेनेझ्युएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांना 'पकडण्यात आले' असेही ते म्हणाले. त्या देशात न्याय्य आणि सुरक्षितपणे सत्तेचे हस्तांतरण होईपर्यंत अमेरिका व्हेनेझ्युएला चालवेल असे ट्रम्प यांनी नंतर पत्रकार परिषदेत जाहीर केले. मादुरो यांना न्यूयॉर्कमध्ये नेण्यात आल्याचेही पुढे स्पष्ट झाले. न्यूयॉर्कमध्ये मादुरो आणि त्यांच्या पत्नीविरुद्ध कायदेशीर खटला दाखल केला जाईल अशी घोषणा अमेरिकेच्या ॲटर्नी जनरलने केली. गेले काही महिने अमेरिकन नौदल आणि हवाई दल व्हेनेझ्युएलाची जहाजे जप्त करत होते. ती जहाजे ड्रग्जची तस्करी करत असत असे ट्रम्प यांचे म्हणणे होते. व्हेनेझ्युएलातून येणाऱ्या ड्रग्जमुळे अमेरिकेत लाखो लोक मरतात असा ट्रम्प यांचा दावा होता. यामुळे तिथले सरकार बदलावे लागेल असा इशारा गेले काही महिने ट्रम्प देत होते. मादुरो गेली बारा वर्षे व्हेनेझ्युएलाच्या अध्यक्षपदी होते. खुद्द अमेरिकेच्या माजी उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांनी व्हेनेझ्युएलासंदर्भातील ट्रम्प प्रशासनाची ही कारवाई बेकायदेशीर व विनाकारण असल्याची टीका केली आहे. त्यामागे तेलाशी संबंधित हितसंबंध आहेत असा आरोपही हॅरिस यांनी केला. मादुरो क्रूर शासक होता हे खरे असले तरी ट्रम्प यांच्या कारवाईनंतर अमेरिका अधिक शक्तिशाली बनत नाही. अशा युद्धांची किंमत अमेरिकन कुटुंबांना मोजावी लागते असेही हॅरिस यांनी म्हटले आहे. या कारवाईचे काय परिणाम संभवतील यावर आता जगभरचे विश्लेषक विचार करत आहेत. हल्ल्यानंतर व्हेनेझ्युएलात आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे. व्हेनेझ्युएलाने अमेरिकेच्या लष्करी आक्रमणाचा निषेध केला आहे. ड्रग्ज आणि तेल हे व्हेनेझ्युएलातले दोन मोठे उद्योग आहेतच. पैकी तेल उद्योगाचे राष्ट्रीयीकरण झाले आहे तर ड्रग्ज उद्योग खाजगी आहे. दोन्ही उद्योगांमधील उत्पन्न राजकीय नेत्यांच्या व व्हेनेझ्युएलातील धनिकांच्या खिशात जाते. देश मात्र टंचाई आणि महागाईचा शिकार झाला आहे हे व्हेनेझ्युएलाचे वास्तव आहे. अमेरिकेने दक्षिण अमेरिकेतील देशांना आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. पण एखाद्या देशात अशातऱ्हेने हस्तक्षेप करताना अमेरिकेने विचार करायला हवा. मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेण्याची अमेरिकेची कृती आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन आहे अशा शब्दांत चीनने अमेरिकेचा निषेध केला आहे. अमेरिकेच्या या कृतीवर भारतानेही चिंता व्यक्त केली आहे तसेच तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. वास्तवत: व्हेनेझ्युएलाच्या तेलक्षेत्रांवर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली ताबा मिळवल्यास भारताला फायदा होऊ शकतो असे म्हटले जाते. भारताची परदेशातील प्रमुख तेलउत्पादक कंपनी ओएनजीसी विदेश लिमिटेड व्हेनेझ्युएलातील पूर्व भागातील तेलक्षेत्र संयुक्तपणे चालवते. मात्र अमेरिकेच्या निर्बंधांमुळे तेथील तेलउत्पादन घटले असून भारतीय कंपनीची सुमारे एक अब्ज डॉलरची थकीत रक्कम दीर्घकाळ अडकून पडली आहे. अमेरिकेच्या नियंत्रणाखालील व्यवस्थेमुळे व्हेनेझ्युएलाचे तेल पुन्हा जागतिक बाजारात येण्यास सुरुवात होऊ शकते. त्या उत्पन्नातून ओएनजीसी विदेश लिमिटेड आपली थकीत रक्कम वसूल करू शकते असे विश्लेषक सांगत आहेत.**

# मतदान जनजागृती





महाराष्ट्रात १५ जानेवारी रोजी महापालिकेची निवडणुक होणार आहे . त्यामुळे जो -तो मतदान आणि त्याचे महत्त्व यावर चर्चा करतो. मतदानाबद्दल आणि जबाबदार मतदार कसे व्हावे याबद्दल माहिती देतो. बरेच लोक मतदान करू इच्छितात, परंतु अनेकांना त्याची गरज आणि ते कसे करावे याबद्दल माहिती नसते. येथेच मतदान जागरूकता येते. मतदान जागरूकतेचा विचार लोकांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगणे आहे. मतदारांना त्यांच्या सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी मतदान हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. मतदानाबद्दल जागरूकता निर्माण करून नागरिकांना त्यांच्या नेत्यांकडून काय हवे आहे ते व्यक्त करण्याची ही एक पद्धत आहे. यामुळे चांगले प्रशासन आणि सर्वांना काय हवे आहे – एक लोकशाही जी मुक्त, निष्पक्ष आणि प्रतिनिधी आहे.

मतदानामुळे नागरिकांना त्यांच्या सरकारमध्ये अधिक सहभागी होण्यास आणि ते जबाबदार राहण्यास मदत होते. मतदान करण्यासाठी, तुम्हाला विशिष्ट आवश्यकता पूर्ण कराव्या लागतील. मतदानाव्यतिरिक्त, जगभरात निष्पक्ष निवडणुका सुनिश्चित करणारे काही कायदे आहेत. मतदान जागरूकता यावरील बायजूचा लघु निबंध आपल्याला मतदानाचे महत्त्व समजून घेण्यास मदत करतो.

मतदानाचे महत्त्व

मतदान हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे आणि लोकांना आवाज उठवणे आवश्यक आहे. प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे, याचा अर्थ असा की सर्व भारतीय त्यांच्या पसंतीच्या पंतप्रधानासाठी मतदान करू शकतात. मतदान करून तुम्ही बदल घडवू शकता आणि तुमच्या समुदायात फरक घडवू शकता. मतदान करणे देखील महत्त्वाचे आहे कारण बहुतेक नागरिक जर एखाद्या कायद्याशी सहमत असतील तरच तुम्ही कायदा रद्द करू शकता.

मतदान हा तुमच्या सरकारशी अधिक नागरिकदृष्ट्या संलग्न राहण्याचा एक मार्ग आहे. तुमचा आवाज ऐकून आणि ज्या लोकांचा आवाज नाही त्यांच्या विचारांचे प्रतिनिधित्व करून जगात बदल घडवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर तुम्हाला बदल घडवायचा असेल, तर मतदान हा एक उत्तम मार्ग आहे. निवडणुकीत मतदान केल्याने नागरिकांना देशाला चांगले अधिकार आणि संरक्षण मिळावे याची खात्री करण्यास मदत होते.

मतदान हे एक महत्त्वाचे नागरी कर्तव्य आहे जे आपल्या देशाच्या भविष्यावर लक्षणीय परिणाम करू शकते. मतदानामुळे राजकारण्यांना त्यांच्या कृतींसाठी जबाबदार राहण्यास मदत होते आणि आपल्या लोकशाहीची चौकट तयार होते. मतदान हे देखील सुनिश्चित करते की सार्वजनिक अधिकाऱ्यांना ते भरण्याची क्षमता असलेल्या लोकांकडून कर रकमेतून पैसे दिले जातात. सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे कर कसा खर्च करायचा – मतदान हे सुनिश्चित करते की आपल्या सरकारच्या बजेटमध्ये जे काही जाते त्याची जबाबदारी आहे. आपल्याला शेवटची गोष्ट अशी हवी आहे की राजकारणी जनतेच्या मताने जबाबदार न राहता सार्वजनिक पैसे खर्च करू शकतील.

मतदान आपला अधिकार आणि आपली जबाबदारी आहे याची जाणीव मतदार राजाला करून द्यावी. आपल्या कुटुंबातील १८ वर्षांवरील मतदार झालेल्या किंवा परिसरातील नागरिकांना मतदान करण्यासाठी जागृत करावे. ते सुद्धा आपल्या मतदारसंघात केव्हा मतदान आहे त्याची तारीख व वेळ सांगावी. त्याचबरोबर मतदान करताना मतदार ओळखपत्र न विसरता घेऊन जावे. जर मतदान ओळखपत्र नसेल तरी मतदार मतदान करू शकतात. त्यासाठी पासपोर्ट, वाहन चालक परवाना, फोटो असलेले कर्मचारी ओळखपत्र, छायाचित्र असलेले बँकांचे/टपाल कार्यालयाचे पासबुक, पॅनकार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीद्वारे दिलेले स्मार्टकार्ड, कामगार मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा स्मार्टकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, छायाचित्र असलेले निवृत्तिवेतन दस्तावेज, खासदार/आमदार/विधान परिषद सदस्य यांना दिलेले ओळखपत्र आणि आधारकार्ड यापैकी एक ओळखपत्र असल्यास मतदान करू शकतात. महत्त्वाची बाब म्हणजे त्यांचे नाव मतदान यादीत असायला हवे.

आजही काही गावांमध्ये मतदानावर बहिष्कार घातला जातो हे पाहायला मिळते. त्यासाठी त्या गावच्या समस्या कोणत्या आहेत त्या जाणून योग्य तोडगा प्रशासनाला काढता आला पाहिजे. त्या आधी त्या गावाला निवडणुकीवर बहिष्कार घालण्याची वेळ का आली? याचे उत्तर शोधावे लागेल. त्यासाठी नि:पक्षपातीपणे प्रशासनाला काम करावे लागेल. तेव्हा मी मतदार आहे, तेव्हा मतदान करून योग्य उमेदवार निवडण्याचा माझा फक्त अधिकार नसून ते माझे राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी आहे, असे प्रत्येक मतदारसंघांतील मतदाराला मतदान करण्यास प्रोत्साहित करावे. तरच मतदानाची टक्केवारी वाढू शकेल. तेव्हा मतदाराने निर्भयपणे मतदान करण्याचा निश्चय करावा. त्याचप्रमाणे इतरांना सुद्धा आपल्या देशातील लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन करावे, तर खऱ्या अर्थाने मतदान जनजागृती होऊन मतदार राजा आनंदाने मतदान करेल. त्यासाठी भारतीय निवडणूक आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी केली तरी गावातील विकासकामे होणे आवश्यक आहे.

आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी जास्तीत जास्त वाढविण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार स्वीप कार्यक्रमाद्वारे मोठ्या प्रमाणावर मतदान जनजागृती केली जात आहे. याचाच एक भाग म्हणून पथनाट्यांचे आयोजन मोठ्या प्रमाणावर केले जात असून गेल्या ७ दिवसांपासून पनवेल,कळंबोली,कामोठे व खारघर प्रभागात विविध ६० ठिकाणी पथनाट्याच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात आली.

विविध ठिकाणी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून खारघर, कळंबोली, कामोठे व पनवेल या चारही प्रभागांमध्ये विविध ठिकाणी पथनाट्य सादर केले जात आहेत. या पथनाट्यांच्या माध्यमातून नागरिकांना आपला उमेदवार कसा असावा, मतदानाचे महत्त्व, मतदानाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक व सार्वजनिक हिताच्या विषयांबाबत नाटिकेच्या माध्यमातून संदेश देण्यात येत आहे

विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये रुजावित, जबाबदार मतदाराचे व मतदानाचे महत्व लक्षात यावे, मतदानाबाबत जागरूकता वाढवावी या उद्देशाने मतदान जनजागृतीसाठीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये महापालिकेच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. संविधान व नागरिक कर्तव्यांची समज यामाध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणार आहे. आपले कुटुंब व समाजात मतदानाबाबत सकारात्मकतेने जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यात येत आहे. नागरिकांमध्ये मतदानाविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी पनवेल शहरात भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या सायकल रॅलीच्या माध्यमातून सुमारे २५० सायकलस्वारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदानाचे महत्त्व सांगणारा संदेश दिला.

*(संकलन: 'रामप्रहर')*

## बदलते तंत्रज्ञान

### जी मेलची 'ही' फीचर्स अतिशय महत्त्वाची

नोकरीसाठी अर्ज करणे, ऑफिसमधील कामे, एखाद्या दुकानदारला ई-मेलद्वारे फोटो पाठवून झेरॉक्स काढणे, जास्त एमबी असलेले फोटो इतरांना शेअर करणे




आदी अनेक गोष्टींसाठी अनेकदा जीमेलचा वापर करण्यात येतो. आज आपण जीमेलच्या काही फीचर्सबद्दलची माहिती घेणार आहोत.

१. ई-मेल अनसेंड करणे : तुम्ही चुकीच्या ई-मेलवर मेसेज पाठवला असेल? किंवा पाठवलेल्या ई-मेलमध्ये काही चुका असतील, तर चिंता करण्याची गरज नाही, कारण जीमेलमध्ये एक खास फीचर आहे. त्यासाठी जनरल सेटिंग्ज मेन्यूमध्ये जा. तिथे 'इनेबल अनडू सेंड' हा पर्याय निवडल्यानंतर तुम्हाला एक लहान Cancellation विंडो दिसेल. ती इनेबल केल्यावर ई-मेल कॅन्सल किंवा अनडू करण्यासाठी ५, १०, २० किंवा ३० सेकंदाचा कालावधी देण्यात येईल.

२. ई-मेलमध्ये एखाद्याला तात्पुरता प्रवेश देणे : तुम्ही सुटीवर गेले असताना तुमचा ई-मेल इनबॉक्स सांभाळण्यासाठी सहकाऱ्याला पासवर्ड न देता सुरक्षितपणे तात्पुरता सांभाळायला देऊ शकता. त्यासाठी तुमच्या जीमेलच्या सेटिंगमध्ये जा. त्यानंतर 'ग्रँण्ट ॲक्सेस टू युअर अकाउंट'च्या खाली तुमचा ई-मेल ॲड्रेस टाका. परत याल तेव्हा सहायक यांना काढून टाका.

३. जीमेलद्वारे शब्दलेखन तपासा : एखादा मेसेज लिहिताना चुका होणे साहजिक आहे, पण या चुका टाळण्यासाठीसुद्धा जीमेल तुम्हाला मदत करेल. तुम्ही एखाद्या व्यक्तीस ई-मेल पाठवण्याअगोदर उजव्या कोपऱ्यातून तीन डॉट असणाऱ्या मेनू आयकॉनवर क्लिक करा. त्यानंतर 'स्पेलिंग तपासा'वर क्लिक करा. जीमेल तुमचा ई-मेल आपोपाप स्कॅन करील आणि त्यात आढळणाऱ्या शुद्धलेखनाच्या कोणत्याही चुका हायलाईट करील जेणेकरून तुम्ही त्या लगेच सुधारू शकता.

४. जीमेल ऑफलाईन वापरा : इंटरनेट कनेक्शन नसतानाही इनबॉक्समध्ये प्रवेश करता यावा यासाठी जीमेलचा ऑफलाइन मोड ॲक्सेस करा. ऑफलाइन सेटिंग्ज टॅब अंतर्गत ऑफलाइन मोड ऑन करा.

५. ऑटो रीस्पॉन्डर सेट करा : कोणतेही ऑफिसचे कोणतेही काम न करता तुम्हाला कुटुंबातील एखाद्या कार्यक्रमाचा आनंद लुटायचा असेल, तर जीमेलमध्ये खाली व्हेकेशन प्रतिरीस्पॉण्डर विभाग स्क्रोल करा आणि तो चालू करा.

# मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर

आज मराठी पत्रकार दिन आहे. वृत्तपत्राचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे मराठीतील सर्वांत पहिले वृत्तपत्र आजच्या दिवशी म्हणजे ६ जानेवारी १८३२ दिवशी सुरू केले होते. त्यामुळे आजचा दिवस मराठी पत्रकार दिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो.

दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्राच्या माध्यमातून देशात मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवणारे बाळशास्त्री जांभेकर मराठी भाषेतील आद्य पत्रकार आहेत. ६ जानेवारी १८१२ रोजी कोकणात एका सामान्य घरात जन्माला आलेल्या बाळशास्त्री यांचे जीवनमान अवघ्या ३४ वर्षांचे होते, पण त्यांच्या विचारांचा ठेवा, कार्याची पद्धत आणि समाजात प्रबोधन घडवून आणण्यात मोलाचा वाटा आहे. बाळाशास्त्री जांभेकर यांचे पहिले मराठी दैनिक ६ जानेवारीला प्रसिद्ध झाल्याने हा दिवस मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो.

१९व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात मराठी समाजमन घडविण्यात बाळशास्त्री जांभेकरांचा मोठा वाटा होता. कोकणातील राजापूर तालुक्यातील पोंभुर्ले या गावी जन्मलेल्या बाळशास्त्रींनी अनेक विषयांचे अभ्यासक-संशोधक, अध्यापक, उत्कृष्ट लेखक, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार



## निमित्त


म्हणून आपल्या कार्याचा ठसा १८३२ ते १८४६ या काळात उमटवला.

ब्रिटिशांनी भारतात येताच कोलकत्त्यामध्ये 'बेंगाल गॅझेट' नावाने इंग्रजी साप्ताहिक २९ जानेवारी १७८० रोजी सुरू केले. ब्रिटिश सरकारने आपल्या स्वार्थासाठी ठिकठिकाणी मुद्रणालये सुरु केली. परंतु कालांतराने आपले विचार प्रकट करण्यासाठी वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम असल्याची भारतीयांना जाणीव झाली. यानंतर अनेक भारतीय भाषांतील वृत्तपत्र निघू लागली. बंगालीनंतर मराठी असा भाषिक वृत्तपत्रांचा क्रम लागतो.

ब्रिटिशांनी भारतात आपले बस्तान सार्वजनिक केल्यानंतर पाश्चिमात्य संस्कृती मूल्यांचा भारतातील पारंपरिक जुन्या मूल्यांशी संघर्ष निर्माण झाला. तथापि, पाश्चात्य संस्कृतीच्या परिचयामुळे भारतीय पंडितांना समाजातल्या घडामोडींची भौतिक दृष्टीने कारणमीमांसा करण्यास प्रोत्साहनही मिळाले. समाजातील वर्ण व्यवस्था, जातीभेद, स्त्री दास्य, सती प्रथा, अस्पृश्यता, बालविवाह आदी जुन्या मूल्यांचा पुनर्विचार करण्यास पंडितांना भाग पाडले. यातूनच एकसंध समाज निर्माण करण्यासाठी समाजातील भेदाभेद गेले पाहिजेत याची त्यांना जाणीव झाली. हळूहळू समाजप्रबोधनाची प्रक्रिया सुरु झाली. यातच वृत्तपत्रांचे आगमन ही घटना क्रांतिकारक ठरली.

दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. इंग्रजी आणि मराठी अशा जोड भाषेत प्रकाशित होणारे हे वृत्तपत्र! या अंकात दोन स्तंभ असत. उभ्या मजकुरात एक स्तंभ (कॉलम) मराठीत आणि एक स्तंभ इंग्रजीत असे. मराठी मजकूर अर्थातच सर्वसामान्य जनतेसाठी होता आणि इंग्रजी मजकूर हा वृत्तपत्रात काय लिहिले आहे हे राज्यकर्त्यांनाही कळावे यासाठी होता. वृत्तपत्राची संकल्पना त्या काळी लोकांना नवीन होती. 'दर्पण'वर प्रथमपासूनच बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा ठसा होता. बाळशास्त्री यांचे वयाच्या अवघ्या ३४व्या वर्षी १८४६ मध्ये निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### युरिक ॲसिडचे प्रमाण वाढल्यास खा 'ही' फळे

आपल्या शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढल्यामुळे त्याचा आपल्या शरीरावर गंभीर परिणाम होतो. मग काहींचे सांधे जड होतात, त्यांचे हात पाय दुखतात, तर काहींच्या पायाला सूज येते, त्यांना थकवा



येतो किंवा त्यांच्या टाचा दुखतात. अशा समस्यांपासून आराम मिळवायचा असेल तर फळे खाणे खूप गरजेचे आहे. हिवाळ्यात युरिक सिडवर कंट्रोलमध्ये आणायचे असल्यास फळे खाणे खूप गरजेचे आहे. आता ही फळे कोणती याबाबत जाणून घेणार आहोत.

**संत्री** : संत्री खाल्ल्यामुळे आपल्या शरीरात युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत होते. संत्रामध्ये व्हिटॅमिन सी असते. त्यामुळे ते आपल्या किडनीचे आरोग्य सुधारते तसेच युरिक ॲसिडची पातळीदेखील नियंत्रित करते. संत्री खाल्ल्यामुळे सांधेदुखीपासूनदेखील आराम मिळतो. सोबतच युरिक ॲसिड वाढल्यानंतर टाच दुखत असेल तर संत्री खा. यामुळे तुमची टाच दुखीदेखील कमी होण्यास मदत होईल.

**किवी** : जर तुमच्या शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण जास्त असेल, तर तुम्ही किवी जरूर खा. किवीमध्ये अनेक पौष्टिक घटक असतात, जे युरिक ॲसिडचे प्रमाण नियंत्रणात आणण्यास मदत करतात. किवीमध्ये पोटॅशियम, व्हिटॅमिन सी, फोलेट, व्हिटॅमिन ई असते, जे युरिक ॲसिड नियंत्रणात आणण्यास मदत करते.

**स्ट्रॉबेरी** : स्ट्रॉबेरी युरिक ॲसिड नियंत्रणात आणण्यासाठी मदत करते. स्ट्रॉबेरीमध्येदेखील व्हिटॅमिन सी असते ज्यामुळे आपल्याला सांधेदुखीपासून आराम मिळतो. स्ट्रॉबेरीमध्ये फायबर, कॅल्शियम, व्हिटॅमिन सी, मॅग्नेशियम असे पोषक घटक असतात, जे आपले शरीर निरोगी ठेवतात आणि यूरिक ॲसिड नियंत्रणात आणण्यासाठी मदत करतात. यासाठी तुम्ही स्ट्रॉबेरीचा रसदेखील घेऊ शकता.

**अननस** : अननस हादेखील युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत करतो. अननसामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे फायबर प्युरीन पचवण्यास मदत करते. जर तुम्हाला युरिक ॲसिडचा त्रास होत असेल, तर अननसाचे सेवन जरूर करा. त्यामुळे तुमची युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत होईल.

# झेडपीसाठी जोमाने कामाला लागा

## खासदार धैर्यशील पाटील यांचे कार्यकर्त्यांना आवाहन; रोह्यात मेळावा

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

तुम्ही कामाला सुरुवात करा. मित्र पक्ष आपल्या सोबत आला तर त्यांच्यासोबत. नाही आलं तर स्वबळावर एकटेच लढण्याची तयारी ठेवा. सरकारमध्ये दोन्ही मित्र आहेत. त्यांचा आदर राखला जाईल. मित्राकडून योग्य मदतीची अपेक्षा करीत भविष्याच्या काळातील निवडणूक निश्चितपणे लढवायचं आणि यशस्वी व्हायचं, असे प्रतिपादन भुवनेश्वर जिल्हा परिषद गटातील भारतीय जनता पार्टीच्या वतीने रविवार दि. ( ४ ) रोजी आयोजित करण्यात आलेल्या निर्धार मेळाव्यात खासदार धैर्यशील पाटील यांनी केले.



भारतीय जनता पार्टी रोहाच्यावतीने भुवनेश्वर जिल्हा परिषद गटाचा निर्धार मेळावा साई द्वारकामाई मंदिर गोडाऊन जवळ एकता नगर भुवनेश्वर येथे आयोजित करण्यात आला होता.यावेळी खा. धैर्यशील पाटील बोलत होते. रोहा नगरपालिका निवडणुकीत रोशनच्या विजयाचा संदर्भ ते म्हणाले , एक लढाई जिंकलेली आहे. दुसरी लढाई जिंकायची आहे. राजकारणात कोणी कोणाला गृहीत धरू नये. सर्वसामान्यांनी रोशनला आशीर्वाद दिला. गृहीत धरणाऱ्याना प्रत्येकाला जनतेने नाकारले त्यांनी चपराक दिलेले आहे. तुम्ही बोलाल सर्वच्या सर्व खर. सगळेच मानतील असं काही होऊ शकणार नाही.मी एका पक्षाचा अध्यक्ष आहे. निर्णय घेत असताना योग्य प्रक्रियेतून जावे लागेल. मित्र पक्षांना विचारावा लागेल. रोशनच्या वेळी जी चूक केली ती परत नाही ना करणार हे मला विचारावे लागेल.मित्र पक्षांना विश्वासात घेत असताना सुद्धा आमची पक्षाची बांधिलकी कोणत्याही मित्रापेक्षा कमळाशीच आहे.हा शब्द यावेळी देतो. मित्रपक्ष हा राहील का, मित्रपक्ष तो राहील का, मित्रपक्ष कोण मिळतील याची फारशी चिंता करू नका. त्यावर अवलंबून राहू नका. ज्यांना लढायचं आहे. त्यांनी जिंकण्यासाठीच लढायचं असतं.

यावेळी भाजप महामंत्री प्रशांत शिंदे, मा. जिल्हा परिषद उपाध्यक्ष आस्वाद पाटील, नगरसेवक रोशन चाफेकर, भाजप महाराष्ट्र प्रदेश सचिव बबलु सय्यद, तालुका अध्यक्ष अमित घाग, तालुका अध्यक्ष महेश ठाकूर, तालुका सरचिटणीस शैलेश रावकर, महीला अध्यक्षा रिया कासार, शहर अध्यक्ष सुमीत रिजबुड, नरेश कोकरे, मेघना ओके, जयश्री भांड, विनायक बेडेकर, प्रकाश धुमाळ, वैभव कुलकर्णी, अरुण वाघमारे उपस्थित होते.

यावेळी प्रशांत शिंदे यांनी दक्षिण रायगड मध्ये वातावरण चांगले आहे. जिल्हा परीषद व पंचायत समितीत यावेळी सर्वाधिक उमेदवार दिसतील. आम्ही सुनील तटकरे, आदिती तटकरे यांना मतदान केले. आज अमितला संधी मिळाला पाहिजे श्रीवर्धन कोणाची मक्तेदारी नाही. आम्हाला संधी मिळाल्यास श्रीवर्धनमध्ये कमळ फुलविल्या शिवाय राहाणार नाही. आस्वाद पाटील यांनी युती आहे. युतीच्या माध्यमातून लढायचे का ते नंतर बघु. युती झाली तर नाही तर लढायचे आहे. युती कोणाची होईल ते त्यावेळी बघु जी जागा येईल ती लढायचे आहे. अमित लढण्याची तयारी ठेवा. संघटना वाढवायची आहे. भाजप जिल्हा परीषदेत १०० टक्के सत्तेत येणार आहे.ही जागा आम्ही मागीतले आहे.

अमित घाग यांनी भाजपचे कार्यकर्ता भुवनेश्वर जिल्हा परिषद गटात घराघरात कमळ फुलविण्यासाठी तयार झाले आहे. कार्यकर्ते पेटुन उठला तर चिखलात कमळ फुलणार आहे.

मुख्यमंत्री देवाभाऊ यांच्या माध्यमातून रस्ते तयार करण्यात आले आहे. या मतदारसंघात प्रत्येक गावात विकास निधी दिला आहे. त्यामुळे कमळ चिन्हावर मतदान करण्यासाठी मतदार उत्सुक आहे.रोशन चाफेकर यांनी २५ वर्षानंतर रोहा अष्टमी नगरपरिषदेत कमळ फुलले आहे.आता यापुढे जिल्हा परीषद मतदार संघात कमळ फुलवणार आहोत. `.यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक रोशन चाफेकर यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

## खोपोलीतील 'तो' विद्युत खांब हलविण्यास प्रारंभ



**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लवजी ते डीपी रोड या दरम्यान रस्त्यावरील रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या विद्युत विभागाच्या खांबामुळे अनेक किरकोळ अपघात झाले होते, हा रस्त्याच्या मधोमध असणारा खांब तातडीने हलवा अशी अनेक वर्षापासूनची मागणी अखेर नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांच्या मध्यस्थीने तो खांब एम एस ई बी चे कनिष्ठ अभियंता राठोड यांनी मान्य करून तात्काळ कामासही सुरुवात झाली आहे.

लहुजी रेल्वे स्थानकांकडून महामुंडकर चौक ते डीपी रोड या दरम्यान विद्युत मंडळाचा रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या खांबामुळे अनेकदा किरकोळ अपघात होत असे, तसेच वाहतोकीला अडथळा होत होता परिसरातील नागरिकांनी अनेकदा विद्युत विभागाला याबाबत कळविले होते दरम्यानच्या काळात निवडणुका लागल्याने आचारसंहिता असल्यानेही त्या कामास विलंब झाल्याचे समजते मात्र निवडणुका संपल्यानंतर नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत संबंधित अभियंता यांना तातडीने सदरचा खांब हलविण्यास सांगितले आणि त्याची कनिष्ठ अभियंता राठोड यांनी तात्काळ कर्मचारी पाठवून हलवण्याचे कामास प्रारंभ केला आहे.

## तुपगाव येथून तरुणी बेपत्ता; तक्रार दाखल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



कु.अंजली निलप्पा शिंगे हि वय २३ वर्षे, व्यवसाय-नोकरी, सध्या रा. तुपगाव, ता. खालापूर जि. रायगड, मुळ रा. हुवीनहल्ली, ता.सिंदगी, जि. विजापुर, राज्य-कर्नाटक, हि दिनांक १० डिसेंबर२५ रोजी सकाळी कामावर जाते असे सांगून घरातुन कोठेतरी निघून गेली आहे.

मुलीचे वडील निलप्पा लिंगप्पा शिंगे यांनी खालापूर पो.स्टे.येथे कु.अंजली बेपत्ता असल्याबाबत खबर दिली आहे. कु. अंजली निलप्पा शिंगे वय.२३ वर्षे रंग-गोरा, उंची ५ फुट ४ इंच अंदाजे, अंगाने-सडपातळ, केस-काळे व लांब, दोन्ही कानात सोन्याच्या बाळ्या, उजव्या हातात साध्या मन्यांचे ब्रेसलेट, अंगात निळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस व ओढणी, पायात निळसर रंगाची सॅन्डल आहे. खालापूर पोलीस वरिल वर्णन असलेल्या महिलेचा शोध घेत आहेत

## रस्त्यालगतचा वणवा देतोय अपघाला निमंत्रण

**खोपोली : प्रतिनिधी**

वणवा पेटविण्याच्या मानवी वृत्ती मध्ये वाढ झाली असून,डोंगराच्या समवेत रस्त्यालगत वणवा पेटविल्याने रस्त्यावर आपघाताला निमंत्रण मिळत आहे.दर वर्षी पावसाळा संपताच माळरानावर मोठ्या प्रमाणात गवत निर्माण होत असते. हेच गवत गुरांचे अन्न असल्यामूळे गुरांच्या चा-यांचा प्रश्न मार्गी लागत आहे.मात्र माळरानावर वनवे लागत असल्यामुळे चा-याचा प्रश्न गंभिर बनत चालला असताना, या गवतावर कोणी अज्ञात व्यक्तीकडुन पेटती काडी टाकुन दिली



जाते आणि त्याचे वणव्यात रूपांतर होते. या वणव्यामुळे पक्ष्यांचे घरटे,गुरांचा चारा औषधी वनस्पती,प्राणी तसेच आता जंगलातील तयार झालेला रानमेवा या वणव्यात जळून खाक होत असल्याचे दुर्दैवी चित्र अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे.सध्या जंगलात रानमेवा तयार होत आहे.परंतू रणरणत्या उन्हामध्ये हा वणवा लागल्याने येथील परीसर असह्य होवून जात आहे.

वणवा लावण्याच्या प्रवृत्तीला बंधने घालणे अत्यंत आवश्यक आहे.कारण वणवा मुळे आदिवासींच्या रोजगाराला खिळ बसत आहे.जंगलात अनेक प्रकारचा रानमेवा, वनस्पती तयार झाले की त्यांच्या वरती अदिवासीच्या कुटुंबांचा उदार निर्वाह होत असतो.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे - बेलवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं. / हि. नं. | क्षेत्र | आकार रु. पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| २९ | ६-००-०० आर.चौ.मी. | ६०.०० | मेसर्स दीप ज्योत एंटरप्रायजेस |
| ३५ | १७-७०-०० आर.चौ.मी. | १७७.०० | मेसर्स दीप ज्योत एंटरप्रायजेस |
| ३८ | ०-०१-८० पो.ख. ०-२७-३० **एकूण ०-२९-१० हे.आर.चौ.मी.** | ०.०८ | मेसर्स दीप ज्योत एंटरप्रायजेस |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०५/०१/२०२६.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना सदर नोटीस द्वारे कळविणेत येते की स.नं. ५, पालीखुर्द, ता. पनवेल, जिल्हा रायगड यांसी क्षेत्र ४६ आर ही जमीन श्री. जगन्नाथ मुळ्या शेळके, मुक्ताबाई गोपाळ पाटील व भुरीबाई दशरथ पाटील यांचे मालकी हक्क व वहिवाटीची असून सदर मिळकत त्यांनी आमचे अशील श्री राजेश शंकरलाल काकाणी रा. वाशी, नवी मुंबई यांना संपूर्ण मोबदला स्विकारून दि. ०३/०१/२००८ रोजीचे नोंदणीकृत ताबे साठेखतान्वये विक्री केली आहे. सदर दस्त हा सब रजिस्टार पनवेल-३ यांचेकार्यालयात अ.क्र. १४४/२००८ अन्वये नोंदविला आहे.

सदर मिळकतीबाबत तिऱ्हाईत इसमांनी बनावट कुलमुखत्यारपत्राचे आधारे बनावट दस्त करून खरेदी विक्री व्यवहार केल्याचे आमचे अशीलांचे निदर्शनास आले आहे. हेमंत रामचंद्र डाके, केशव बंडू गवते रा. पनवेल यांनी बनावट कुलमुखत्यारपत्राचे आधारे सदर मिळकत दिपक चतरलाल मेहता रा. पनवेल व महावीर कुमार चोरडीया रा. वाशी, नवी मुंबई यांना परस्पर विक्री केली. सदर मिळकत वर नमूद दिपक चतरलाल मेहता व महावीर कुमार चोरडीया यांनी ललितकुमार चंडालिया रा. पनवेल यांना विक्री केली. सदर बनावट कुलमुखत्यारपत्रा बाबत तहसील कार्यालयात चौकशी केली असता सदर कुलमुखत्यारपत्र हे सदर कार्यालयात नोंदविले नसून ते बनावट असलेबाबत माहिती तहसील कार्यालयाकडून प्राप्त झाली आहे.

सदर कुलमुखत्यारपत्रावरील जमीन मालकांच्या सहया बनावट असून तहसील कार्यालयाचे शिक्के, सहया पण बनावट आहेत. तसेच या बनावट कुलमुखत्यार पत्राचे आधारे हेमंत रामचंद्र डाके, केशव बंडू गवते रा. पनवेल यांनी मा. उपविभागीय अधिकारी, पनवेल यांची दिशाभूल करून शेत जमीन खरेदी विक्री व्यवहारास परवानगी पण मिळवली आहे. या सर्व बेकायदेशीर कृत्यांबाबत वरील इसमांविरूद्ध योग्य ती फौजदारी कार्यवाही करणेबाबत पोलीस तसेच मुंबई उच्च न्यायालय येथे आमचे अशील दाद मागणार आहेत. दरम्यानचे काळात सदर मिळकत विक्री बाबत काही व्यवहार होवून अजून कोणाची फसवणूक होवू नये म्हणून प्रस्तुतची नोटीस दिली आहे. तरी सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी. जर कोणीही यापुढे या सदर मिळकतीबाबत वर नमूद इसमांबरोबर व्यवहार केला तर अगर केला असल्यास त्याचे होणाऱ्या सर्व कायदेशीर परिणामांची व खर्चाची जबाबदारी त्यांचेवर राहील व कोणाचीही कोणतीही तक्रार किंवा म्हणणे नंतर ऐकून घेतले जाणार नाही याची नोंद घेणेत यावी.

दिनांक : ०६/०१/२०२६
ठिकाण : पनवेल

**एस. बी. झंवर**
**(ॲडव्हाकेट)**
१२२६/ए, शुक्रवार पेठ, सुभाषनगर कॉलनी, विवेक अपार्टमेंट, पुणे ४११००२, मो. ९४२२००८६०८

### महाराष्ट्र शासन
### महसूल व वनविभाग

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग
तहसिल कार्यालय, अलिबागच्यामागे, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१
दुरध्वनी क्र.०२१४१-२२४४३४, ई मेल sdoalibag@gmail.com

क्र.उविअ/कात-२/भूसंपादन/मौजे राजेवाडी/नोटीस/एस.आर. क्र. ०२/२०२५ — दि. २/०१/२०२६

### नोटीस
(नियम ६ नुसार)

याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, खालील अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली आणि गाव राजेवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड येथे असलेली जमीन, भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये न्याय नुकसानभरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याचे कलम ११ (१) अन्वये उपविभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग, जि. रायगड यांचेमार्फत महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, नोव्हेंबर २७ - डिसेंबर ३, २०२५ रोजी पृष्ठ १४ ते १६ येथे प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेप्रमाणे आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. तद्नुसार त्या जमिनीमध्ये हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना जर त्यांचा उक्त भुमी संपादनास आक्षेप असेल तर वरील प्राथमिक अधिसुचनेप्रमाणे आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, तद्नुसार त्या जमिनीमध्ये हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना, जर त्यांचा उक्त भुमी संपादनास आक्षेप असेल तर, वरील प्राथमिक अधिसुचना प्रसिध्द करण्यात आल्यापासुन ६० (साठ) दिवसांच्या आत, त्यांच्या आक्षेपांचे लेखी निवेदन उपविभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग यांच्यासमोर सादर करण्यास फर्मावण्यात येत आहे.

जे आक्षेप निवेदन नियम तारखेनंतर पोहोचले असेल किंवा ज्यामध्ये पाठवणाऱ्याच्या जमिनीतील हितसंबंधाचे स्वरुप स्पष्टपणे विशद केलेले नसेल असे कोणतेही आक्षेप निवेदन तडकाफडकी नाकारले जाण्यास पात्र असेल.

नियत दिनांकास पोहोचलेल्या आक्षेपांची दिनांक **१०/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग** यांचे कार्यालय येथे चौकशी करण्यात येईल आणि आक्षेप घेणाऱ्यास व्यक्तिश: किंवा अधिवक्त्यामार्फत तेथे उपस्थित राहता येईल आणि आपल्या आक्षेपाच्या पुष्ट्यर्थ कोणताही तोंडी किंवा लेखी पुरावा सादर करता येईल.

**मौजे :- राजेवाडी** — **तालुका :- अलिबाग** — **जिल्हा :- रायगड**

| अ.क्र. | स.नं./ ग.नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | संपादना खालील क्षेत्र हे. आर. | हितसंबंधित व्यक्तीचे नाव व पत्ता | इतर अधिकारात | झाडे, बांधकामे, इत्यादी असल्यास त्यांचे तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ८ पै | ०२.९६.४० | ०.२५.०० | इब्राहिम अयुब पठाण, सुरैय्या मजहर गोरमे, शरीफ कादिर मुजावर, हमीद कादिर मुजावर, अस्लम कादिर मुजावर, इरफान कादिर मुजावर, नौशाद कादिर मुजावर, दिलदार कादिर मुजावर, शहनाझ मिर्झा मुजावर, साजीया नुरमहमद कबले, शाद मिर्झा मुजावर, मोहसिन मिर्झा मुजावर, मुराद लतीफ मुजावर, जावीद लतीफ मुजावर, रज्ञाक लतीफ मुजावर, रझिया कैसर दणदणे, समद लतीफ मुजावर | -- | -- |
| २ | २७ पै | ००.४०.०० | ०.०६.०० | बाळकु चंद्र्या पवार | -- | -- |
| ३ | २८ पै | ०३.०६.५० | ०.३२.०० | जनार्दन महादेव कोंडके, नारायण महादेव कोंडके, भास्कर महादेव जाधव, अरुणा बाळाराम जाधव, ३) राकेश बाळाराम जाधव, ४) वैशाली बाळाराम जाधव, ५) लिला अशोक गोठणकर वारस ३,४,५ अपाक अरुणा बाळाराम जाधव, रंजीत बाळाराम जाधव, मंगल अर्जुन राणे अपाक आई, अमित अर्जुन राणे, कादिर उस्मान मुजावर, ताहीर उस्मान मुजावर, अमिनाबाबी महमदुसाले मुजावर, शरीफा लतीफ पाटील, करीमा महमद मुजावर, जैनाबीबी लतीफ मुजावर, जावेद लतीफ मुजावर, समद लतीफ मुजावर, लक्ष्मीबाई रामचंद्र राणे, राजेंद्र रामचंद्र राणे, मंगेश रामचंद्र राणे, निलेश रामचंद्र राणे | सहकारी सोसायटी इकरार महान सो.सा.चा. १८००/- बोजा, बोजा - सहकारी सोसायटी इकरार दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकरी बँक लि. अलिबाग शाखा अलिबाग यांचा र.रु. १०००००/- | |

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : २/०१/२०२६**

सही/-
**(मुकेश चव्हाण)**
उपविभागीय अधिकारी अलिबाग
उपविभाग अलिबाग

जिमाका/रायगड/जाहिरात/३४०/२६/२०२६

### महाराष्ट्र शासन
### महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

### निविदा सूचना क्रमांक ६३ सन २०२५-२६

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पद्म विभूषण पांडुरंगशास्त्री आठवले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हसळा, इमारतीची दुरूस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. | ४०९९४४८/- | ४१०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच |
| २ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रीवर्धन, इमारतीचे दुरूस्तीची कामे करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | ६०५७९८५/- | ६१०००/- | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ |
| ३ | मौजे लाखपाले ता. माणगांव येथे सामाजिक सभागृह बांधणे. जिल्हा रायगड | १६८९९८९/- | १७०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ |
| ४ | मौजे वडघर मुद्रे ता. माणगांव येथे सामाजिक सभागृह बांधणे. जि. रायगड. | ८४३६५१/- | ९०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग सात |
| ५ | दहिवड वाकी शेवते रस्ता रा.मा. १०६.कि.मी. ०/०० ते ८/०० मध्ये वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. ता. महाड, जि.रायगड | ८२२९४३/- | ९०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग सात |
| ६ | वर्ग १ अधिकारी निवासस्थानाची साफसफाई करणे. ता. महाड, जि. रायगड | ४१३२८०/- | ५०००/- | ५९०/- | १ महिना | वर्ग सात |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०५/०१/२०२६ (सकाळी १०.०० पासून)** ते दिनांक **१२/०१/२०२६ वेळ १८.००** वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जि.रायगड यांचे कार्यालयात दिनांक **१५/०१/२०२६** वेळ १०.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**आरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी ४९९९**
**दिनांक : ५/०१/२०२६**

सही/
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# दागिने चोरणाऱ्या तीन जणांना अटक

## गुन्हे शाखा पनवेल कक्षाकडून चार घटना उघडकीस



**पनवेल : वार्ताहर**

महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने खेचणा–या ०३ अट्टल चोरट्यांना गुन्हे शाखा कक्ष ०३, पनवेल यांनी अटक करून त्यांच्या कडून चार गुन्हे उघडकीस आणले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये काही अनोळखी आरोपी हे मोटारसायकल वरून भरधाव वेगाने येवून महिलांच्या गळ्यातील सोन्याचे किंमती व मौल्यवान दागिने जबरीने खेचुन जबरी चोरी करत असल्याबाबत अनेक गुन्हे दाखल आहेत.

महिलांसाठी सोन्याचे दागिने हा भावनिक विषय असतो. अशा गंभीर गुन्हयांची तात्काळ उकल करण्याबाबत पोलीस आयुक्त, मिलिंद भारंबे, सह. पोलीस आयुक्त संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांनी सुचना दिलेल्या होत्या. गुन्हेगार मोटरसायकल वरून अचानक येवून काही क्षणात महिलांचे गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने खेचुन नेतात. अशा आरोपींबाबत फिर्यादी व साक्षीदारांकडे विचारपुस करताना मर्यादीत माहिती मिळते. त्यामुळे सदरचे गुन्हे उघडकीस आणणे पोलीसांना आव्हानात्मक असते.

गुन्हे शाखा कक्ष ३, पनवेल, नवी मुंबई कडील पोलीस पथकाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये घडलेल्या गुन्हयांची माहिती प्राप्त केली. घडलेल्या गुन्हयांच्या घटनास्थळी जावून फिर्यादी, साक्षीदार यांना भेटुन, घटनास्थळाचे आजुबाजुचे प्राप्त सीसीटिव्ही फुटेजचे सखोल तपासणी करून तसेच तांत्रिक तपास करून पनवेल शहर पोलीस ठाणे दाखल गुन्हयामध्ये तीन आरोपींना अटक केली आहे.

पोलिसांनी मोहम्मद शफिक हनिफ शाह (वय २८), विवेक विश्वनाथ सोनार (वय २५), आदर्श हरिसिंग दर्जी (वय २५) या आरोपीना अटक केली आहे. वरील आरोपींना अटक करून त्यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास करुन ९,९३,५०० रूपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत केला. तसेच पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील २ कामोठे आणि खारघर पोलीस ठाण्यातील १–१ असे ४ गुन्हे उघडकीस आणुन त्या गुन्हयातील जबरी चोरी झालेला १०० टक्के मुददेमाल हस्तगत केला आहे.

ही कामगिरी अजयकुमार लांडगे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि अविनाश काळदाते, सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, माधव इंगळे, सफौ अनिल पाटील, पोहवा रमेश शिंदे, प्रमोद राजपूत, प्रशांत काटकर, अजित पाटील, निलेश पाटील, रूपेश पाटील, इंद्रजित कानू, दीपक डोंगरे, सागर रसाळ, पोहवा हिरकणी पवार, पोना अजिनाथ फुंदे, मपोना विनया पाटील, पोशि लवकुश शिंगाडे, प्रसाद घरत, विक्रांत माळी यांनी केली आहे.

# नेत्रा व किरण पाटील दाम्पत्याच्या बंडखोरीला सुज्ञ मतदारांनी बळी पडू नये

## भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत खारघर परिसरात भाजप महायुतीच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात नेत्रा पाटील व त्यांचे पती किरण पाटील यांनी स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी उमेदवारी अर्ज दाखल करून उघड बंडखोरी केली आहे. त्यामुळे त्यांच्या कोणत्याही भूलथापांना बळी न पडता प्रभागाच्या सर्वांगीण आणि सातत्यपूर्ण विकासासाठी सुज्ञ मतदारांनी भाजप महायुतीच्याच अधिकृत उमेदवारांना मतदान करावे, असे ठाम आवाहन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले आहे.

सन २०१७ मध्ये झालेल्या पनवेल महापालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने विश्वास दाखवत नेत्रा पाटील यांना उमेदवारीची संधी दिली होती आणि त्या नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या. मात्र या वेळी पक्षाने उमेदवारी न दिल्यामुळे नाराज होत पाटील दाम्पत्याने पक्षशिस्त झुगारून देत भाजपकडे राजीनामा सादर केला आणि स्वतंत्रपणे उमेदवारी अर्ज दाखल केला.

गेल्या आठ वर्षांच्या कालावधीत भाजपच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली खारघरमध्ये विकासकामे, पायाभूत सुविधा, सामाजिक उपक्रम आणि नागरिकाभिमुख योजना राबवण्यात आल्या. या संपूर्ण कालावधीत पक्ष संघटनेने नेत्रा पाटील व किरण पाटील यांना संघटनात्मक बळ, सहकार्य आणि व्यासपीठ उपलब्ध करून दिले, मात्र या सर्व योगदानाचा सोयीस्कर विसर पाडत पाटील दाम्पत्याने केवळ स्वतःच्या राजकीय महत्त्वाकांक्षेसाठी भाजप महायुतीच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. यानंतर त्यांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून, त्यामुळे नेत्रा पाटील आणि किरण पाटील यांचा आता भाजपशी कोणताही संबंध उरलेला नाही. त्यामुळे भाजप महायुतीचे कार्यकर्ते, पदाधिकारी, हितचिंतक तसेच सामान्य नागरिकांनी या दाम्पत्याला कोणत्याही प्रकारचे सहकार्य करू नये, असे आवाहनही जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले आहे.

भाजप महायुतीच्या अधिकृत उमेदवारांनाच विजयी करावे, असे आवाहन कोळी यांनी केले आहे.



**पनवेल : येथील महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दलित पॅन्थर संघटनेने भाजप महायुतीला आपला अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब पडवळ यांनी सोमवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पाठिंब्याचे पत्र सुपूर्द केले. या वेळी या भेटीदरम्यान दलित पॅन्थर संघटनेचे संघटक तुळशीदास पाटील हेदेखील उपस्थित होते.**

# निवडणूक कर्तव्यावर नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदान

**नवी मुंबई : बातमीदार**

निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी मोठया संख्येने शासकीय–निमशासकीय कर्मचारी कार्यरत असतात. निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असताना कर्मचाऱ्यांचा मतदार म्हणून मतदानाचा हक्क डावलला जाऊ नये यादृष्टीने राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार टपाली मतदान सुविधा महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीकरिता प्राधान्याने रायगड जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच नवी मुंबईतील सिडको व इतर शासकीय–निमशासकीय कार्यालये, खासगी शाळा येथील कर्मचाऱ्यांची निवडणूक कामाकरिता नेमणूक करण्यात आली आहे. अशा कर्मचाऱ्यांकरिता तसेच जे कर्मचारी नवी मुंबईचे मतदार आहेत मात्र त्यांची नेमणूक निवडणूक कर्तव्यावर झालेली आहे अशा कर्मचा–यांना मतदान करता यावे याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या आठही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात विशेष टपाली सहाय्यता मतदान कक्ष स्थापन करण्यात आला असल्याची माहिती याविषयाच्या नोडल अधिकारी तथा उपायुक्त स्मिता काळे यांनी दिली आहे.

याकरिता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मतदार म्हणून नोंदणी असलेले अधिकारी – कर्मचारी यांनी अंतिम मतदार यादीत




आपले नाव व नंबर तपासून ते ज्या प्रभागात मतदार आहेत त्या प्रभागाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे ८ जानेवारी २०२६ रोजी प्रपत्र पीबी–१ नमुन्यात आपले सूचनापत्र/अर्ज देऊन मतपत्रिकेची मागणी करावयाची आहे. यासोबत त्यांनी आपला निवडणूक कर्तव्यावर नियुक्ती झाल्याचा आदेश जोडणे आवश्यक आहे.

अर्जदारांना आपले टपाली मतदान नोंदविण्याकरिता मदतीसाठी आठही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या

### आठही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात विशेष कक्ष स्थापन

कार्यालयात विशेष टपाली मतदान सहाय्यता कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. त्याठिकाणी ८, ०९, १०, ११, १२ जानेवारी २०२६ या पाच दिवसांत कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष उपस्थित राहिल्यास टपाली मतदानाबाबत मार्गदर्शन व सहाय्य मिळेल.

नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय स्तरावरही विशेष टपाली मतदान सहाय्यता कक्ष स्थापन करण्यात आला असून याबाबतच्या माहिती व अडचणींसाठी ९८१९४५२४८७ हा हेल्पलाईन क्रमांक कार्यालयीन वेळेत कार्यरत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे nmmcpostalballot@gmail.com हा ईमेल आयडी संपर्कासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

याबाबत सर्वच महापालिकांमध्ये सुसूत्रता व समन्वय राहावा या दृष्टीने नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सर्व महापालिकांचे आयुक्त यांना पत्र लिहून नवी मुंबई महापालिका क्षेत्रात मतदार असणारे आणि त्या महापालिका कार्यालयाकडे निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असणारे अधिकारी, कर्मचारी यांच्या निदर्शनास ही बाब आणून द्यावी, असे पत्राद्वारे कळविले आहे. अशाच प्रकारचे पत्र नवी मुंबई पोलीस आयुक्त यांनाही देण्यात आलेले आहे.

# बीसीटी लॉ कॉलेजची खांदेश्वर पोलीस ठाण्यात भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालय यांनी खांदेश्वर पोलीस स्टेशन येथे २ जानेवारी २०२६ रोजी पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त कार्यक्रमात एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी हजेरी लावली. हा कार्यक्रम एनएसएसच्या उपक्रमांतर्गत असून, कायद्याची अंमलबजावणी, सार्वजनिक सुरक्षितता, नागरी जबाबदाऱ्या आणि सायबर गुन्ह्यांबाबत जागृती निर्माण करण्यावर भर होता.

या सत्रात ५० एनएसएस स्वयंसेवकांची हजेरी घेण्यात आली. खांदेश्वर पोलीस स्टेशनचे अधिकारी स्मिता ढाकणे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक), सचिन परदेशी (पोलीस निरीक्षक), कैलेश म्हात्रे (कॉन्स्टेबल) यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातून रोहिणी कल्याणकर (प्राध्यापिका आणि एनएसएस कार्यक्रम अधिकारी) व संग्राम पवार (प्राध्यापक) उपस्थित होते. परदेशी यांनी ऑनलाईन फसवणूक, फिशिंग, ओळख चोरी यांसारख्या सायबर गुन्ह्यांबाबत माहिती दिली आणि १९३०, १९४५ हे हेल्पलाइन क्रमांक सांगितले.

हा कार्यक्रम प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे झाला. हा कार्यक्रम विधी महाविद्यालयीन विद्यार्थी आणि पोलीस यांच्यात सहकार्य वाढवून विद्यार्थ्यांमध्ये कायदेशीर जागृती वाढवला.

# संस्कार भारतीतर्फे अखिल भारतीय भरतमुनी सन्मान पुरस्कारांची घोषणा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कला व साहित्याच्या क्षेत्रात अखिल भारतीय स्तरावर कार्यरत असलेल्या संस्कार भारती या संस्थेने अखिल भारतीय भरतमुनी सन्मान २०२५ च्या पुरस्कारर्थींच्या नावांची घोषणा केली आहें.

लोककला व दृश्यकला या विभागातील कलाकरांना व हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. लोककलेच्या विभागात छत्तीसगढ येथील वेदमती शैलीतील प्रख्यात पंडवानी गायिका प्रभा यादव तसेच दृश्यकलेच्या विभागात पुणे, महाराष्ट्र येथील सुप्रसिद्ध चित्रकार चिंतामणी हसबनीस यांना त्यांच्या दीर्घकालीन कलासाधनेसाठी व आपल्या कार्यक्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण योगदानाबद्दल १ फेब्रुवारी २०२६ रोजी ठाणे (महाराष्ट्र) येथे होणाऱ्या भव्य समारंभात अखिल भारतीय भरतमुनी सन्मान–२०२५ पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

संस्कार भारतीचे अखिल भारतीय महामंत्री अश्विन दळवी यांनी सांगितले की, संस्कार भारतीतर्फे दिला जाणारा हा ‘अखिल भारतीय भरतमुनी सन्मान’ पुरस्कार भारतात पंचम वेद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाट्यशास्त्र ग्रंथाचे रचनाकार महर्षी भरतमुनी यांना समर्पित आहे. कला माध्यमांतून समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या असाधारण कलाकारांचा गौरव दरवर्षी केला जातो. या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी कलाकारांची निवड तज्ज्ञांच्या समितीद्वारे करण्यात आली आहे, त्यांच्या समाजाभिमुख कलासाधनेमुळे आम्ही प्रेरित झालो आहोत, असेही त्यांनी नमूद केले.

हा पुरस्कार सुप्रसिद्ध शास्त्रीय नृत्यांगना, पद्मविभूषण पुरस्कारप्राप्त व माजी राज्यसभा सदस्या विदुषी सोनल मानसिंह यांच्या हस्ते, तसेच संस्कार भारतीचे अखिल भारतीय अध्यक्ष व सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक डॉ. मैसूर मंजुनाथ यांच्या उपस्थितीत रविवार, १ फेब्रुवारी २०२६ रोजी गडकरी रंगायतन, ठाणे, महाराष्ट्र येथे आयोजित समारंभात प्रदान करण्यात येणार आहे.

पुरस्काराचे स्वरूप, स्मृतिचिन्ह, प्रशस्तिपत्र आणि रुपये १,५१,०००/– रोख रक्कम असे स्वरूप आहे. कार्यक्रमादरम्यान दोन्ही कलासाधकांच्या कार्यावर आधारित लघुपटही प्रदर्शित करण्यात येणार आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, कला क्षेत्रातील हा प्रतिष्ठित सन्मान दरवर्षी दोन कला विभागांसाठी प्रदान केला जातो.

# तुराडे येथे महिलांचा सत्कार



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राजिप शाळा तुराडे यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांचे १९५वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी जयंती साठी उपस्थित असणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवर महिलांचे स्वागत ढोल ताशांच्या गजरात करण्यात आले.

यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मान्यवरांच्या स्वागतासाठी एक स्वागत गीत सादर करून सत्कार करण्यात आले. तसेच ही जयंती सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा केक कापून साजरी करण्यात आली. तसेच बालिका दिन असल्याने या वेळी बालिका दिनाचे हे महत्त्व सांगण्यात आले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाईंना शिकवल्यामुळे व त्यांच्या धाडसामुळे आज महिलांना भारतामध्ये शिक्षण मिळण्याला सुरुवात झाली त्यामुळेच आज महिलांचा सर्वांगीण विकास होताना दिसत आहे, असे मत सरपंच रंजना गायकवाड यांनी व्यक्त केले.

या वेळी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चोपडे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितलं की, या वेळी आम्ही ज्या महिलांनी आपल्या कार्यक्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला अशा महिलांचा सत्कार करून ही जयंती साजरी करण्यात यावी असा मानस त्यांचा होता. त्याप्रमाणे तुराडे ग्रामपंचायत सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड, उपसरपंच मालती वाघमारे, सदस्य लीना मयूर ठाकूर, डॉ. अंजली केने, युट्युबर जिया गायकर, आशा वर्कर जयश्री चव्हाण, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष पिंगळे ताई या सर्वांचं शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी विद्यार्थ्यांच्या वतीने या मान्यवर महिलांना प्रश्न विचारण्यात आले व त्या प्रश्नातून समाधानकारक अशी उत्तरे मिळाले. जेणेकरून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल असा या कार्यक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमासाठी उपस्थित माजी सरपंच सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ गायकवाड, मयूर ठाकूर, प्रदीप माळी, संतोष वाघमारे आणि मुख्याध्यापक चोपडे, श्रीवंत आणि पाटील उपस्थित होते.

शाळेच्या वतीने चहा नाश्त्याचे आयोजन करण्यात आले होते तर सरपंच रंजना गायकवाड यांच्याकडून सर्व मुलांना बिस्कीट पुडे खाऊ वाटप करण्यात आला या वेळी सर्व मुलांच्या चेहऱ्यावरती आनंद दिसत होता.

# नवी मुंबईत पत्रकार दिनानिमित्त परिसंवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई प्रेस क्लब व नवी मुंबई यनियन ऑफ जर्नालिस्टस् यांच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त मंगळवार, ६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शहर विकासात सत्ताधारी व विरोधकांकडून जनतेच्या अपेक्षा या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. जागर लोकशाहीचा, उत्सव निवडणुकीचा अभिमान नवी मुंबईचा या संकल्पनेवर आधारित हा परिसंवाद मराठी साहित्य, संस्कृती व कला मंडळ, सेक्टर ६, वाशी, नवी मुंबई येथे होणार आहे.

या परिसंवादात विविध क्षेत्रांतील मान्यवर वत्ते आपले विचार मांडणार आहेत. यामध्ये नवी मुंबई महापालिकेतील सेवानिवृत्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. संजय पत्तीवार सेवानिवृत्त शहर अभियंता डॉ. मोहन डगांवकर, सामाजिक कार्यकर्ते संदीप ठाकूर, बिल्डर असोसिएशन ऑफ नवी मुंबईचे अध्यक्ष तथा विश्वस्त देवांग त्रिवेदी, स्त्रीमुक्ती संघटना तसेच नवी मुंबई स्वयंसेवी समन्वय संस्थेच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या प्रा. वृषाली मगदूम, ज्येष्ठ पत्रकार संजयकुमार सुर्वे यांचा समावेश आहे.

नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी सामान्य नागरिकांना नेमके काय हवे आहे आणि महापालिकेतील सत्ताधारी आणि विरोधकांकडून जनतेच्या काय अपेक्षा आहेत, यावर अनुभवी व तज्ञ वक्ते आपले विचार मांडणार आहेत. नवी मुंबईकर नागरिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व मतदारांनी मोठ्या संख्येने या परिसंवादास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धांचा शानदार सोहळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर–ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने शालेय वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन २ व ३ जानेवारी रोजी करण्यात आले होते.

रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भव्य क्रीडांगणावर या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या क्रीडा स्पर्धांच्या उदघाटनासाठी अध्यक्ष म्हणून विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रभाकर जोशी, प्रमुख पाहुणे सुजाता जोशी, सखी सावित्री समितीच्या सदस्या तसेच सचिन वास्कर, जयदास तेलवणे, विद्यालयाचे माजी विद्यार्थी व पनवेल तालुका वकिल संघटनेचे सदस्य ॲड. ईर्शाद शेख आदी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, माध्यमिक विभागाचे प्र.मुख्याध्यापक संतोष खांदेकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग उपस्थित होते.



या मान्यवरांचे स्वागत विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक क्रीडा शिक्षक संभाजी जाधव यांनी केले. यावर्षी जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड व पनवेल महानगरपालिका आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये जिल्हा व विभागस्तरावर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये एकूण १११ पदके जिंकली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावर्षी झालेल्या जिल्हास्तरीय व विभागस्तरीय स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमार्फत क्रीडांगणावर क्रीडाज्योतीचे संचलन करुन कार्यक्रमस्थळी अखंडपणे प्रज्वलीत ठेवण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभाकर जोशी यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत मैदानाचे पूजन करुन श्रीफळ वाढविण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्लॅपर वाजवून धावणे या स्पर्धांना सुरुवात करण्यात आली.

या स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान पदक व चषक देऊन गौरविण्यात आले. या क्रीडा स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. सदर स्पर्धांचे योग्य नियोजन विद्यालयाचे क्रीडा शिक्षक संभाजी जाधव, सहाय्यक शिक्षक अभिजित जोगदंडे, स्वप्नाली पवार, अजित पाटील यांनी केले होते. स्पर्धेचे पंच म्हणून उच्च माध्यमिक विभागाचे क्रीडा शिक्षक प्रविण पाटील हे उपस्थित होते.

# आंबेवाडी ते निवी कालव्याची कामे सुसाट

## प्रशासन दक्ष; नागरिकांत सकारात्मक भावना

**धाटाव : प्रतिनिधी**

तब्बल दहाबारा वर्षे अक्षरशः कोमात गेलेला आंबेवाडी ते निवी हद्दीतील कालवा पूर्वीच्याच दमाने पूर्वपदावर यायला प्रारंभ झाला आहे. कालवा दुरुस्तीवर पाटबंधारे विभागाने आतापर्यंत करोडो रुपयांचा निधी खर्च केला. तिसे, वाशी, लांढर, निवी, तळाघर हद्दीतील नादुरुस्त मोठे सायपन, एस्कॅप नव्याने केले. अनेक ठिकाणचे ब्रिज झाले.

कालव्याची लायनिंग कामे, ठिकठिकाणच्या दुरुस्तीची कामे पाहता अगदी एक्सप्रेस वेगाने सुसाट सुरू असल्याचे अधोरेखीत झाले. कालवा दुरुस्तीबाबत मागील दोनतीन वर्षे कोलाड पाटबंधारे प्रशासन मुख्यतः संबंधीत अधिकारी एकदम दक्ष असल्याचे दिसत आहे. गाव हद्दीतील एस्कॅप, मायनरची कामे दर्जेदार होत असल्याने परिसरातील नागरिकांत सकारात्मक भावना निर्माण झाल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. एवढेच काय? निवी हद्दीतील मायनरची कामे पूर्णतत्त्वास आली. शनिवारी रात्रौ रस्त्याखालील जुने पाईप बदलून नविन टाकण्यात आले. हा काम पहाटेपर्यंत चालू होता. सहा. कार्य. अभियंता श्वेता चिचुळकर, सहा. अभियंता रत्नदीप वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली कालवा निरीक्षक निलेश दिसले व टीमने हा काम पूर्ण केला.

दरम्यान, आंबेवाडी ते निवी कालव्याच्या पाण्यासाठी, कालवा पूर्वपदावर येण्यासाठी सर्व शेतकरी, नागरिक समावेश बळीराजा फाऊंडेशनच्या सातत्यपूर्ण लढ्याला अभूतपूर्ण यश आल्याचे स्पष्ट झाले तर तिसे, संभे, आंबेवाडी हद्दीतील काही महत्त्वाची कामे करण्याची टेंडर प्रक्रिया सुरू आहे. कालव्याची सर्वच कामे पूर्ण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. निधी अधिक उपलब्ध होणार आहे अशी माहिती कार्य. अभियंता मिलिंद पवार यांनी दिल्याने आंबेवाडी ते निवी कालव्याला नवसंजीवनी मिळेल असा विश्वास शेतकऱ्यांतून व्यक्त झाला आहे.





### बळीराजा फाऊंडेशनच्या लढ्याला यश

महत्त्वाची दुरुस्ती कामे जानेवारी अखेरीस पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील, लगेचच साफसफाई करत पाणी सोडण्याचे प्रयोजन आहे असे अधिक कार्य अभियंता मिलिंद पवार यांनी निवी हद्द काम पाहणीदरम्यान सांगितल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. दरम्यान, कालव्याची करोडो रुपयांची दुरुस्ती कामे पाहता बळीराजा फांऊडेशनच्या लढ्याला अभुतपूर्ण यश आले असेच नागरिकांतून बोलले जात आहे.

कोलाड पाटबंधारेच्या आंबेवाडी ते निवी कालव्याला दशकभर पाणी नसल्याने परिसर पूर्णतः वाळवंट झाला. याकडे कोणीच लक्ष दिले नव्हते. कालवा इतिहासजमा होणार ? याच घटनांत परिसरातील तरुण एकत्र झाला. आधी कालवा समन्वय समिती नंतर बळीराजा फांऊडेशनची स्थापना करून पाण्यासाठी, कालवा दुरुस्तीसाठी निकराचा लढा उभा केला. विधिमंडळात विषय लावून धरल्याने राज्य शासनाने कालव्याच्या दुरुस्ती कामांकडे विशेष लक्ष दिले. खासदार सुनिल तटकरेंनी जातीने लक्ष घालत दुरुस्ती कामांना अधिक गती देण्याचा प्रयत्न केला. कार्य अभियंता मिलिंद पवार यांनी प्रस्तावीत कामे वरिष्ठांसमोर ठेवत भरघोस निधी मिळवला. त्यातून आतापर्यंत करोडोंची दुरुस्ती झाली. आता लांढर, बोरघर हद्दीत लायनींग, निवी हद्दीत मापनर व ठीकठिकाणी दुरुस्ती कामे सुरू आहेत.

यासाठी बळीराजा फाऊंडेशनचे संस्थापक राजेंद्र जाधव, अध्यक्ष विठ्ठल मोरे व पदाधिकारी कायम सतर्क आहेत, कामाची माहिती घेत अधिकारी, ठेकेदार यांच्यासाठी सहकार्य भूमिकेत आहेत. सहा कार्य अभियंता श्वेता चिचूलकर, सहा. अभियंता रत्नदीप वासनिक सातत्याने कामांची पाहणी करत आलेत. शनिवारी निवी येथील रस्त्याखालील पाईप बदलण्याचे काम रात्रभर चालले, प्रशासनाचे काम पाहता आंबेवाडी ते निवी परिसरातील नागरिकांत सकारात्मक भावना निर्माण झाल्याचे दिसून आले.

# माणगावात होणार ३०० दिव्यांगांना मोफत कृत्रिम पाय बसविण्याचा उपक्रम

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो यांच्या निधीतून आयोजित भारत विकास परिषद कोथरूड व दिव्यांग केंद्र, पुणे यांच्यातर्फे वनवासी कल्याण आश्रम शाळा, उतेखोल, दत्तनगरजवळ माणगाव जि.रायगड येथे रविवार, १ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य मोफत दिव्यांग शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती दिव्यांग केंद्राचे विश्वस्त व केंद्रप्रमुख विनय खटावकर यांनी माणगाव येथे ५ जानेवारी रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

या शिबिरामध्ये पूर्व नावनोंदणी केलेल्या सुमारे ३०० दिव्यांग बांधवांना मोफत आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय आणि हात बसविण्यासाठी मोजमाप घेण्यात येणार आहे. भारत विकास परिषद कोथरूड व दिव्यांग केंद्र, पुणे यांचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरणार आहे.

भारत विकास परिषद ही सेवा व संस्कार या भावनेतून कार्य करणारी राष्ट्रीय स्तरावरील संघटना असून, दिव्यांगांना कृत्रिम अवयव बसविणे हा तिचा प्रमुख राष्ट्रीय सेवा उपक्रम आहे. देशभरातील ३७ दिव्यांग केंद्रांपैकी महाराष्ट्रातील पुणे येथील दिव्यांग केंद्र गेल्या २५ वर्षांपासून अखंडपणे कार्यरत आहे.

शिबिराच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, माणगावचे कार्यवाह अजित शेडगे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या वेळी दिव्यांग केंद्राचे विश्वस्त व केंद्रप्रमुख विनय खटावकर आणि विनोद दप्तरदार यांनी शिबिराच्या सविस्तर नियोजनाबाबत तसेच आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पायांच्या वैशिष्ट्यांबाबत माहिती दिली.



माहिती देताना त्यांनी सांगितले की, आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पायाची बाजारातील किंमत ५० हजार रुपयांपेक्षा अधिक असते. असे उच्च दर्जाचे कृत्रिम पाय या शिबिरात ३०० दिव्यांगांना पूर्णतः मोफत देण्यात येणार आहेत. पारंपरिक जयपूर फूटच्या तुलनेत हे ऑर्थोपेडिक, वजनाने हलके, टिकाऊ व अधिक कार्यक्षम आहेत. हे कृत्रिम पाय बसवल्यानंतर दिव्यांग व्यक्ती चालणे, पळणे, पोहणे, उडी मारणे, वाहन चालविणे तसेच शेतीसह दैनंदिन कामे सहज करू शकतात. तज्ञ डॉक्टर व तांत्रिक कर्मचाऱ्यांकडून आवश्यक ते प्रशिक्षण व मार्गदर्शनही दिले जाणार आहे.

दिव्यांग बांधवांसह त्यांच्या सोबत येणाऱ्या व्यक्तींसाठी मोफत भोजन व्यवस्थाही करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण उपक्रमाची माहिती रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त दिव्यांगांपर्यंत पोहोचवून त्यांना या सेवेचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन पत्रकार परिषदेत विनय खटावकर यांनी केले आहे.

### पूर्व नोंदणी आवश्यक

या शिबिरासाठी माणगाव परिसरातील तसेच रायगड, रत्नागिरी व शेजारच्या जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी फोनद्वारे पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे. पूर्व नोंदणीशिवाय शिबिरात प्रवेश दिला जाणार नाही, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. संपर्कासाठी : विनोद – ९८८११ ३८०५२ चंद्रशेखर – ९८२३० २४२३२ सदर शिबिर वनवासी कल्याण आश्रम शाळा,उतेखोल,माणगाव (जि. रायगड) येथे रविवार १ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार असून, त्या दिवशी सर्व नोंदणीकृत दिव्यांगांचे कृत्रिम अवयवासाठी आवश्यक मोजमाप घेतले जाणार आहेत.

# शारदा मंदिरमधील विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे धडे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील शारदा मंदिर मराठी माध्यम येथे सावित्रीबाई फुले जयंती आणि राष्ट्रीय बालिका दिन साजरा करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांना अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले आणि प्रामुख्याने विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले.

कर्जत येथील अभिनव ज्ञान प्रबोधिनी एज्युकेशनल ट्रस्टचे शारदा मंदिर, कर्जत शाळेत सावित्रीबाई फुले जयंती आणि राष्ट्रीय बालिका दिन साजरा करण्यात आला. या वेळी कायदेविषयक मार्गदर्शन करण्यासाठी ॲड. रेशमा ताम्हणकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली किसवे यांनी स्वागत केले. सावित्रीबाई फुले कार्यक्रमाचे निमित्ताने प्रतिमा पूजन करण्यात आले. या वेळी पर्यवेक्षिका श्रद्धा जामघरे, ऋतुजा रुमडे उपस्थित होत्या.




ॲड. रेशमा ताम्हणकर यांनी, मुलींसाठी स्वसंरक्षण किती महत्त्वाचे आहे आणि त्यांना आपले स्वसंरक्षण कसे करता येईल याचे मार्गदर्शन करताना प्रात्यक्षिकही दाखवले. स्वसंरक्षण करण्यासाठी कराटे शिकण्याची गरज असल्याचे सांगितले. मुलींसाठी शासनाकडून देण्यात येणाऱ्या सोयी व सवलती मुलींचे व स्त्रियांचे हक्क–कायदे, अडचणीच्या काळात आवश्यक असलेले पोलिसांच्या क्रमांकाबद्दल माहिती दिली.

# रातवड विद्यालयाचे संस्थास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत यश

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती वक्तृत्व स्पर्धा २०२५–२६ शनिवार, ३ जानेवारी २०२६ रोजी विवेकानंद संकुल, सानपाडा येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

या संस्थास्तरीय स्पर्धेत रायगड विभागाची उज्ज्वल परंपरा कायम राखत माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले. इयत्ता आठवी मधून कुमारी आर्या दिगंबर पालकर हिने प्रथम क्रमांक, इयत्ता नववी मधून कुमारी सृष्टी सोनाजी पवार हिने प्रथम क्रमांक, तर इयत्ता दहावी मधून कुमारी संस्कृती केतन ऐत हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवून विद्यालयाचे व रायगड विभागाचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण विचारमांडणीने, प्रभावी शब्दसौंदर्याने व सामाजिक जाणिवेने उपस्थितांची मने जिंकली.



या घवघवीत यशामागे विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. शारदा निवाते, मार्गदर्शक शिक्षक अजित शेडगे तसेच सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सातत्यपूर्ण परिश्रम आहेत. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.नंदकिशोर जोशी, सरचिटणीस डॉ. निलेशजी रेवगडे, सर्व पदाधिकारी, पालकवृंद, माजी विद्यार्थी व शिक्षणप्रेमींनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

# सत्यजित बडेंची महाराष्ट्र विकास सेवेत निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांची भारतीय प्रशासकीय सेवेत (आय.ए.एस.) निवड झाली आहे. सन २००० मध्ये सत्यजित बडे यांची महाराष्ट्र विकास सेवेत निवड झाली होती.

सत्यजित बडे यांनी गट विकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आदी विविध पदांवर काम केले आहे. राज्य लोकसेवा आयोगाच्या घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेद्वारे त्यांची सन २००० मध्ये विकास शाखेत गटविकास अधिकारी/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी या संवर्गात निवड झाली.



सत्यजित बडे यांनी सन २००२ ते २००७ या कालावधीत आंबेगाव आणि त्यानंतर सांगली जिल्ह्यातील वाळवा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी म्हणून काम केले आहे. सन २०१३ ते २०१७ या कालावधीत ते पुणे जिल्हा परिषदेचे तर सन २०१७ ते २०१९ या कालावधीत सातारा जिल्हा परिषदेत सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. सन २०१९ मध्ये त्यांची विकास शाखेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संवर्गात निवड झाली आणि या निवडीनंतर त्यांची वर्धा जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारीपदी निवड झाली. सन २०२२ पर्यंत त्यांनी वर्धा जिल्हा परिषदेत काम केले. सन २०२३ पासून ते रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

सन २०१२ मध्ये ग्रामविकास विभागांतर्गत देण्यात येणारा 'यशवंत गुणवंत अधिकारी' हा पुरस्कार बडे यांना मिळाला आहे. हा पुरस्कार मिळालेले सर्वात कमी वयाचे ते पहिले अधिकारी आहेत. याशिवाय त्यांनी यशवंत पंचायतराज अभियानामध्ये उल्लेखनीय कामकाज केलेले आहे. शिवाय राज्य सरकारमार्फत गठीत करण्यात येणाऱ्या विविध समित्यांवर त्यांनी काम केले आहे. रायगड जिल्ह्यात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार सांभाळताना ग्रामीण विकासाच्या दृष्टीने बडे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. सत्यजित बडे यांचे वडील कै.देवीदास बडे हे उपजिल्हाधिकारी होते. त्यांनी सातारा जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून काम पाहिले आहे. सन १९९९ मध्ये ते अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावरून सेवानिवृत्त झाले होते.

# माणगावमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील वारक येथे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असा मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, नेरूळ–नवी मुंबई तसेच उषःकाल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात येत आहे.

हे आरोग्य शिबिर मंगळवार ०६ जानेवारी २०२६ला सकाळी १०.३० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत रा.जि.प. प्राथमिक शाळा, वारक, ता. माणगांव जि. रायगड येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांसाठी रक्तदाब, शुगर तपासणी, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार हृदयाची ई.सी.जी. तपासणी, फुफ्फुसांची तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि गरजूंना मोफत औषध वाटपासोबतच उषःकाल फाउंडेशनतर्फे मोफत चष्मा वाटप करण्यात येणार आहे.



विशेष म्हणजे, या शिबिरामार्फत महात्मा ज्योतिराव फुले आयुष्मान भारत योजना तसेच तेरणा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून विविध आजारांवरील उपचार व शस्त्रक्रिया अत्यल्प दरात उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये हृदयविकार, डोळ्यांचे विकार, किडनी, कॅन्सर, हाडांचे आजार, स्त्रीरोग, बालरोग, जनरल सर्जरी आदींचा समावेश आहे.

शिबिराला येताना नागरिकांनी जुने वैद्यकीय रिपोर्ट, औषधे, रेशन कार्ड, ओळखपत्र व संपर्क क्रमांक तसेच नातेवाईक सोबत आणण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

माणगाव तालुक्यातील नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन उषःकाल फाउंडेशनचे संस्थापक नामदेव शिंदे यांच्याकडून करण्यात आले आहे.

# विजय शापुरकरांना डाक कार्यालयातर्फे सेवानिरोप

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड–जंजिरा डाक कार्यालयातून विजय कृष्णा शापुरकर हे विहित वयोमानानुसार पोस्टमन या पदावरून ३६ वर्षे प्रदीर्घ सेवा बजावत निवृत्त झाल्याने त्यांना अलिबाग अधिक्षक डाक विभाग प्रमुख सुनील थळकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले

या वेळी सहाय्यक अधिक्षक डाक विभाग अलिबाग–रायगडचे राकेश मिश्रा, विनोद मेदार, एस.डी.आय.पी महाड डिव्हिजन डाक विभाग, महाडचे सुरेश मोरे, दिनेश शापुरकर, दिलीप शापुरकर, ॲड. सुरेश पाटील, प्रा. मेघराज जाधव, सब पोस्ट मास्तर दीपक घाटवळ आदी उपस्थित होते.



या वेळी सुनील थळकर यांनी विजय शापुरकर विषयी बोलतांना म्हणाले की, पोस्टमन म्हणून काम करताना अतिशय प्रामाणिक पणे बटवडा करून अनेक कुटुंबाशी जिव्हाळ्याचे संबंध जोपासले. त्यांनी निष्ठापूर्वक व नम्रतेने केलेली सेवा हे डाक कर्मचाऱ्यांसाठी आदर्श उदाहरण असल्याचे सांगून शापूरकर यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# खामदे ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील सावली ग्रामपंचायत हद्दीमधील खामदे ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये जाहीर पक्षप्रवेश केला आहे. या वेळी खासदार सुनील तटकरे उपस्थित होते.

सर्व ग्रामस्थांचे त्यांनी या वेळी पक्षात स्वागत केले आहे. या वेळी व्यासपीठावर जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, मुरूड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेरमन मनोज भगत, नगराध्यक्षा आराधना दांडेकर , माजी सभापती अशीका ठाकूर, स्मिता खेडेकर,माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक, माजी सरपंच अजित कासार, मिठागर गाव प्रमुख सुनील मिसाळ, माजी जिल्हा परिषद सदस्य नम्रता कासार,हसमुख जैन, मुरुड तालुका उपाध्यक्ष शाम कोतवाल, खामदे गाव अध्यक्ष कमलाकर भाने, सावली विभागीय अध्यक्ष प्रभाकर पाटील आदी उपस्थित होते.



या वेळी खासदार सुनील तटकरे आपल्या भाषणात म्हणाले कि, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केल्यामुळे आगरदांडा ते इंदापूर रस्त्याचे काँक्रिटीकरण माझ्या पाठपुराव्यामुळे झाले आहे. खाजणी ते रोहा या रस्त्याचेसुद्धा काँक्रिटीकरण होणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

यावेळी मनोज भगत यांचे सुद्धा मार्गदर्शन भाषण झाले. कार्यक्रमात खामदे येथील ओमश्रीगजानन प्रासादिक भजन मंडळ यांच्यासहित कमलाकर भाने, हरिशन्द्र हातचांगे, बाळकृष्ण बसवत, नरेश अपीने, मुकेश बसवत, जितू गनी, निलेश बसवत, महेश वास्कर, धर्मा पोटदुखे, तुकाराम हातचांगे आदींसह ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये पक्ष प्रवेश केला आहे.

# डेजर्ट वायपर्स आयएल टी-२० चॅम्पियन

**दुबई : वृत्तसंस्था**

संयुक्त अरब अमिरातीमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय लीग टी-२० स्पर्धेतील यंदाच्या हंगामातील अंतिम सामन्यात मुंबई इंडियन्स फ्रँचायझीचा एमआय एमिरेट्स विरुद्ध डेजर्ट वायपर्स यांच्यात जेतेपदाची लढत रंगली होती. दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात सॅम करनच्या नेतृत्वाखालील डेजर्ट वायपर्सने किएरॉन पोलार्डच्या एमआय एमिरेट्सला ४६ धावांनी पराभूत करत यंदाच्या हंगामातील जेतेपदावर नाव कोरले.



अंतिम सामनयत कर्णधार सॅम करनने ७४ धावांची शानदार नाबाद खेळी करत वायपर्सना ९८२ धावांपर्यंत पोहचण्यास मदत केली. या आव्हानाचा पाठलाग करताना एमआय एमिरेट्स १३६ धावांवर सर्वबाद झाली. डेझर्ट वायपर्सचे हे पहिले आयएलटी २० विजेतेपद आहे, तर एमआय एमिरेट्सला १६ वर्षांत पहिल्यांदाच अंतिम फेरीत पराभव सहन करावा लागला आहे.

गेल्या दोन हंगामात अंतिम सामना गमावणाऱ्या डेझर्ट वायपर्सने मुंबई इंडियन्सचा पराभव करून पहिल्यांदाच विजेतेपद जिंकले. मुंबई संघाने १६ वर्षांत पहिल्यांदाच अंतिम सामना गमावला आहे.

एमआयच्या संघाने आंद्रे फ्लेचरला फक्त २६ धावांवर गमावले होते. या विकेटनंतर एमआयचे फलंदाज सातत्याने बाद झाले. शकिब अल हसनने संघाकडून सर्वाधिक ३६ धावा केल्या. पोलार्डनेही संथ खेळी केली. त्याने २८ चेंडूत २८ धावा केल्या. डावाची सुरुवात करताना मोहम्मद वसीमने १० चेंडूत २६ धावा केल्या. इतर कोणताही क्रिकेटपची संघासाठी प्रभावी कामगिरी करू शकला नाही आणि एमआय एमिरेट्स संघाचा पराभव झाला.

डेजर्ट वायपर्सच्या नसीम शाहने शानदार गोलंदाजी करत तीन बळी टिपले. त्याने पोलार्डसह आंद्रे फ्लेचर आणि टॉम बँटन यांना बाद केले. नसीमने चार षटकांत केवळ १८ धावा देत तीन महत्त्वाच्या विकेट्स घेत किफायतशीर गोलंदाजी केली.

### फायनलमध्ये राडा

अंतिम सामन्यात कॅरेबियन स्टार किरॉन पोलार्ड आणि पाकिस्तानचा नसीम शाह यांच्यातील वादाचा मुद्दा चर्चेचा विषय ठरत आहे. आयएल टी-२०च्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरुन दोघांच्यातील शाब्दिक वादावादीचा व्हिडिओ शेअर करण्यात आला असून तो तुफान व्हायरल होताना दिसत आहे. एमआय एमिरेट्सच्या डावातील ११व्या षटकात नसीम गोलंदाजी करत होता. षटकाच्या अखेरच्या चेंडूवर त्याने गुड लेंथवर मारा केला. पोलार्डने हा चेंडू लेग साईडला खेळण्याचा प्रयत्न केला, मात्र चेंडू थेट बॅटला लागून पॅडवर आदळला. त्यानंतर नसीमने पोलार्डकडे रोखून पाहू लागला. यावर पोलार्डही नसीमजवळ गेला आणि दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. मैदानातील पंचांनी मध्यस्थी करत वाद मिटवल्याचे पहायला मिळाले.

# कॅलिसला मागे टाकण्याची हिटमॅन रोहित शर्माला संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडिया २०२६मधील पहिला आणि एकदिवसीय मालिका मायदेशात खेळणार आहे. भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे. बीसीसीआयने या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली. रोहित शर्मा आणि विराट कोहली या भारताच्या अनुभवी जोडीकडून क्रिकेट चाहत्यांचे या मालिकेत धमाकेदार खेळीची आशा आहे. हिटमॅन रोहितला या मालिकेत खास यादीत आणखी पुढे जाण्याची संधी आहे.



भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यातील एकदिवसीय मालिकेला ११ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. रोहितला या मालिकेत एकदिवसीय धावांबाबत दक्षिण आफ्रिकेचा माजी ऑलराउंडर जॅक कॅलिस आणि पाकिस्तानचा माजी फलंदाज इंझमाम उल हक या दोघांना मागे टाकण्यासाठी संधी आहे.

रोहितने एकदिवसीय कारकीर्दीत २७९ सामन्यांमधील २७१ डावांत ११ हजार ५१६ धावा केल्या आहेत. रोहितला आता कॅलिसला एकदिवसीय धावांबाबत मागे टाकण्यासाठी फक्त ६४ धावांची गरज आहे. कॅलिसने ३२८ एकदिवसीय सामन्यांत ११ हजार ५७९ धावा केल्या आहेत.

याशिवाय रोहितला इंझमामला मागे टाकण्यासाठी २२४ धावांची गरज आहे. अवघ्या तीन सामन्यांत २२४ धावा करणे सोपे जरी नसले तरी ते अवघडही नाही. ही मालिका भारतात होत आहे. रोहितची बॅट तळपली तर तो इंझमामला एकाच खेळीसह मागे टाकू शकतो.

# बांगलादेशात आयपीएल प्रसारणावर बंदी



**ढाका : वृत्तसंस्था**

बीसीसीआयच्या निर्देशानंतर कोलकाता नाईट रायडर्सने बांगलादेशी खेळाडू मुस्तफिजूर रेहमान याला रिलीज केल्याने बांगलादेश सरकारला मिरच्या झोंबल्या आहेत. इंडियन प्रीमियर लीगचे प्रक्षेपणावर अनिश्चित काळासाठी सरकारने बंदी आणली आहे.

अधिकृत आदेशात म्हटले आहे की, आयपीएल संदर्भातील सर्व प्रक्षेपण, प्रमोशन आणि इव्हेंट कव्हरेजवर तत्काळ प्रभावाने बंदी घालण्यात येत आहे. हे आदेश पुढची सूचना येईपर्यंत लागू राहतील. याबाबतचे निर्णय संबंधित प्रशासनाने लोकांच्या हितासाठी घेतला आहे.

नुकतेच कोलकाता नाईट रायडर्सने मुस्तफिजूर रेहमानला आयपीएल २०२६च्या हंगामापूर्वीच रिलीज केल्यानंतर आला आहे. याबाबत बीसीसीआयने केकेआरला निर्देश दिले होते.

बांगलादेशने प्रसिद्ध केलेल्या आदेशात, बीसीसीआय क्रिकेट बोर्डाने घेतलेल्या निर्णयाचे कोणतेही तार्किक कारण नाहीये. या निर्णयामुळे बांगलादेशमधील लोकांना धक्का बसला असून अस्वस्थता आणि राग आहे. त्यामुळे प्रशासनाला आयपीएल प्रक्षेपणावर बंदी घालण्याचा निर्णय घेणे भाग पडल्याचे सांगण्यात आले.

# रवींद्र जडेजा राजस्थान रॉयल्सचा नवा कर्णधार?

**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६च्या आधीच राजस्थान रॉयल्सच्या गोटात मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. संघाने कर्णधार संजू सॅमसनला ट्रेड करून चेन्नई सुपर किंग्सकडे पाठवले आणि त्याबदल्यात अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजा तसेच सॅम करन यांना आपल्या संघात दाखल करून घेतले. संजू सॅमसनच्या जाण्यानंतर आता सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, आयपीएल२०२६ मध्ये राजस्थान रॉयल्सची धुरा कोण सांभाळणार?

राजस्थान रॉयल्सने अलीकडेच सोशल मीडियावर रवींद्र जडेजाचा एक फोटो शेअर केला. या फोटोखाली लिहिलेले कॅप्शन 'सून थलापथी' यामुळे क्रिकेट चाहत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. तमिळ भाषेत थलापथी म्हणजे नेता किंवा सेनापती. या एका ओळीमुळे जडेजालाच राजस्थानचा नवा कर्णधार बनवले जाणार का, अशी जोरदार चर्चा सुरू झाली आहे, मात्र फ्रँचायझीकडून अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही.




संजू सॅमसनच्या कर्णधारपदाखाली राजस्थानने २०२५ची आयपीएल खेळली होती. त्या काळात रियान परागला उपकर्णधारपद देण्यात आले होते. संजू दुखापतीमुळे बाहेर असताना काही सामन्यांत परागने संघाचे नेतृत्वही केले होते. त्यामुळे तो कर्णधारपदाचा मजबूत दावेदार मानला जात आहे. याशिवाय युवा खेळाडूंमध्ये ध्रुव जुरेल आणि यशस्वी जायसवाल यांचीही नावे चर्चेत आहेत, मात्र अनुभवाच्या बाबतीत पाहिले, तर रवींद्र जडेजा सर्वात पुढे आहे.

जडेजाचा राजस्थान रॉयल्ससोबतचा संबंध जुना आहे. २००८मध्ये राजस्थान रॉयल्सने आयपीएलचे पहिले विजेतेपद पटकावले, तेव्हा जडेजा या संघाचा भाग होता. २००९मध्येही तो राजस्थानसाठी खेळला होता. त्यानंतर २०१२पासून तो चेन्नई सुपर किंग्सकडे गेला.

### तगडा अनुभव

रवींद्र जडेजाकडे आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि आयपीएलचा प्रचंड अनुभव आहे. मोठे सामने कसे जिंकायचे याचा अनुभव आहे. कर्णधार पदासाठी आवश्यक असलेला संयम, अनुभव आणि रणनीतीची समजही जडेजाकडे आहे. त्यामुळे फ्रँचायझी त्याच्यावर विश्वास टाकू शकते, असे क्रिकेट वर्तुळात बोलले जात आहे.

# जो रूटचे ४१वे शतक; रिकी पाँटिंगची बरोबरी

**सिडनी : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूटने ॲशेस मालिकेतील सिडनी कसोटीत शतक झळकावत शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतक झळकावणाऱ्या खेळाडूंच्या यादीत जो रूट तिसऱ्या स्थानी पोहचला आहे. रूटने कसोटी प्रकारातील ४१वे शतक झळकावत रिकी पाँटिंगच्या शतकांची बरोबरी केली.

रूटने ११ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ऑस्ट्रेलियातील शतकांचा दुष्काळ ब्रिस्बेन कसोटीत संपवला. आपला फॉर्म कायम राखत रूटने आणखी एक शतक पूर्ण केले. त्याने १४६ चेंडूत शतक गाठले. २०२१पासून रूटचे हे २४वे शतक आहे. या कालावधीत सर्वाधिक शतके त्यानेच झळकावली आहेत.



रिकी पाँटिंगने १६८ सामन्यात ५१.८६च्या सरासरीने १३३७८ धावा केल्या आहेत. यामध्ये ४१ शतके आणि ६२ अर्धशतकांचा समावेश आहे. सर्वाधिक शतकांच्या यादीत सचिन तेंडुलकर ५१ शतकांसह अव्वल स्थानी आहे.

जॅक कॅलिस ४५ शतकांसह दुसऱ्या, तर पाँटिंग आणि रूट प्रत्येकी ४१ शतकांसह तिसऱ्या स्थानी आहेत. रूटला कसोटीत १४ हजार धावांचा टप्पाही खुणावतो आहे.

# पत्रकारांच्या क्रिकेट सामन्यात पनवेल संघ विजयी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पत्रकार दिनाचे औचित्य साधून भाताण येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आयोजित वेध विकासाचा पत्रकार चषक २०२६ स्पर्धेत पनवेल संघाने विजय मिळविला. या संघाला ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या हस्ते झाले. या वेळी कर्जत-खालापूर पत्रकार संघ आणि पनवेल पत्रकार संघ यांच्यात दोन षटकांचा सामना खेळवण्यात आला. नाणेफेक जिंकून कर्जत-खालापूर पत्रकार संघाने प्रथम फलंदाजी करताना १६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल पनवेल संघाने शेवटच्या एक चेंडूत एक धाव आवश्यक असताना चौकार लगावत विजय साकारला. विजयानंतर कर्णधार मयूर तांबडे, रत्नाकर पाटील, प्रमोद चौलकर, सुभाष वाघपंजे, अनिल कुरघोडे, आसिम शेख, सुनील पाटील, सुनील वारगडा यांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला.

स्पर्धेस मनसे तालुकाध्यक्ष रामदास पाटील, ॲड. संतोष खांडेकर, माजी उपसभापती वसंत काठवले, उद्योजक मोहन लबडे, भाजप कामगार प्रदेशाध्यक्ष अनंताबुवा पाटील, विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, शिवाजी माळी, माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, नितीन पाटील, सुभाष लाखांबले, महादेव पाटील, तानाजी पाटील, भाताण सरपंच अरुण पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनिल काठवले, कसळखंड सरपंच संजय घरत नंदू पाटील, यांच्यासह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्ल्डकप सामने भारताबाहेर खेळवण्याची बांगलादेशची मागणी मान्य होणे कठिण

**दुबई : वृत्तसंस्था**

बीसीसीआयने नुकतेच कोलकाता नाईट रायडर्सला बांगलादेशी खेळाडू मुस्तफिजूर रहमान याला त्वरित रिलीज करण्याचे आदेश दिले होते. केकेआरनेदेखील बीसीसीआयच्या आदेशानंतर आपण मुस्तफिजूरला रिलीज केल्याचे सांगितले. सध्या बांगलादेशातील अंतर्गत स्थिती अत्यंत स्फोटक अन् हिंसक झाली असून गेल्या काही दिवसात हिंदूंच्या हत्या होण्याचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने हा निर्णय घेतला.

बीसीसीआयच्या या निर्णयानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डाने टीका केली होती. सध्या बीसीसीआय आणि बांगलादेश क्रिकेट बोर्डामधील संबंध ताणले गेले आहेत. दरम्यान, भारतात होणाऱ्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर बांगलादेश क्रिकेट बोर्डाने आयसीसीला त्यांच्या संघाचे भारतात होणारे सामने श्रीलंकेत हलवण्याची मागणी केली आहे.

### आयसीसीच्या भूमिकेकडे लक्ष




आयसीसी बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या या मागणीवर विचार करू शकते, मात्र आता सामन्याचे शेड्युल बदलणे सोपे असणार नाही. आयसीसीने अजूनपर्यंत याबाबत कोणती अधिकृत भूमिका किंवा बैठक घेतलेली नाही. 'क्रिकबज'च्या रिपोर्टनुसार या निर्णयात अनेक विषयांची गुंतागुंत असणार आहेत.

अशा परिस्थितीत दोन्ही सरकारांची भूमिका मोठी असणार आहे. बीसीसीआय अशा प्रकारचे मोठे निर्णय हे सरकारवर सोपवते. आता भारत सरकार बांगलादेशच्या या मागणीकडे कसे पाहते त्यावर कोणता निर्णय होतो हे अवलंबून असणार आहे. नुकतेच भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हे बांगलादेश दौऱ्यावर गेले होते, मात्र याबाबत आताच कोणता निष्कर्ष काढणे घाईचे ठरू शकते.

**सर्व वेळापत्रक बिघडणार**

सर्वात मोठी समस्या ही लॉजेस्टिकची होणार आहे. यामुळे याबाबतच्या निर्णयाला थोडा उशीर लागू शकतो. आयसीसी सर्व परिस्थिती लक्षात घेतल्यानंतरच कोणतेही पाऊल उचलण्याची शक्यता आहे. या सर्व गोष्टीत बीसीसीआयची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. वर्ल्डकप सुरू होण्यासाठी फार दिवस राहिलेले नाहीत. अशा परिस्थितीत सर्व शेड्युल बदलणे अत्यंत कठिण होणार आहे. यामुळे फक्त बांगलादेशच नाही, तर सर्व संघाचे वेळापत्रक बिघडणार आहे.

### एमसीए आयोजित मुलींची क्रिकेट स्पर्धा

# रायगडच्या मुलींचा सुपर लीगमध्ये प्रवेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) वतीने आयोजित १९ वर्षाखालील मुलींच्या एकदिवसीय ५० षटकांच्या आंतरजिल्हा निमंत्रित संघांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगडच्या मुलींच्या संघाने साखळी फेरीतील सामन्यात सातारा जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघावर एक गडी राखून दिमाखात विजय मिळवला. यासह रायगड संघाने पुढील होणाऱ्या सुपर लीग सामन्यांसाठी दमदारपणे प्रवेश मिळवला.



पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या अटीतटीच्या सामन्यात रायगडच्या संघाला जिंकण्यासाठी १० धावांची गरज होती, तर साताऱ्याच्या संघाला एक विकेट हवी होती. रायगडच्या दोन रणरागिणी समिधा तांडेल व स्वरा भगत मैदानावर झुंज देत होत्या. समिधाने चौकार ठोकत सामना रायगडच्या बाजूने वळवला होता, तर अखेरच्या क्षणी स्वरा भगतनेदेखील घरच्या मैदानावर विजयी चौकार मारत संघाला विजयी मिळवून दिला आणि मैदानावर एकच जल्लोष सुरू झाला.

साताऱ्याच्या संघाने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजी करतांना ३९.२ षटकांमध्ये सर्व गडी बाद १३५ धावसंख्या उभारली होती. त्यामध्ये आर्या फडतरे हिने सर्वाधिक ३६ धावा केल्या, तर रायगडकडून वेदिका तेटगुरेने चार, समिधा तांडेलने तीन आणि स्वरा खेडेकरने दोन फलंदाज बाद केले.

यानंतर रायगडच्या संघाने ४५.२ षटकांमध्ये नऊ गडी गमावत १३८ धावा काढून विजय मिळवला. त्यामध्ये रायगडची सलामीवीर तंत्रशुद्ध तडाखेबाज फलंदाज ब्रतती राय हिने सर्वाधिक ४९ धावांची दमदार खेळी केली. तिला संस्कृती पालकर हिने ३० धावा करून साथ दिली, तर शेवटच्या विकेटसाठी झुंझार खेळी करणाऱ्या समिधा तांडेल व स्वरा भगत यांनी जिंकण्यासाठी आवश्यक असणाऱ्या धावा काढून संघाला विजय मिळवून दिला.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सामना पाहण्यासाठी उपस्थित होते. त्यांनी रायगडच्या सर्व लढवय्या मुलींचे कौतुक व अभिनंदन केले. रायगडच्या मुलींच्या संघाने एक गडी राखून विजय मिळवत इतिहास रचला असून साखळी फेरीतील पाचपैकी चार सामने जिंकत सुपर लीग सामन्यांसाठी प्रवेश निश्चित केला आहे.

# रायडू पुन्हा बनला बाबा!

**चेन्नई : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा 'थ्री डी' मॅन आणि चेन्नई सुपर किंग्सचा माजी स्टार फलंदाज अंबाती रायडू आणि त्याची पत्नी चेन्नुपल्ली विद्या यांनी तिसऱ्या अपत्याचे स्वागत केले आहे.



अंबाती रायडूने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर नवजात बाळासोबत पत्नीचा हॉस्पिटलमधील फोटो शेअर करत बाबा झाल्याचा आनंद व्यक्त केला आहे. त्याच्या या फोटोवर शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे. भारतीय क्रिकेटरने २००९मध्ये व्हॅलेंटाईन डेच्या दिवशीच चेन्नुपल्ली विद्या हिच्यासोबत लग्न केले होते.

# 'ऑलिम्पिक यजमानपद मिळवण्यासाठी भारताची भक्कम पावले'

**वाराणसी : वृत्तसंस्था**

भारत २०३६मधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी पूर्ण ताकदीने तयारी करत आहे. भारतातच या स्पर्धा घेण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू असल्याची ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी दिली.

वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात पंतप्रधान मोदी बोलत होते. आभासी पद्धतीने ते उद्घाटन सोहळ्यात सहभागी झाले होते. 'उदयोन्मुख खेळाडूंना ऑलिम्पिक खेळात सहभागी होण्याची संधी देण्यासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. भारत २०३०मध्ये राष्ट्रकुल स्पर्धेचेही आयोजन करणार आहे. खेलो इंडियासारख्या योजना देशातील क्रीडा प्रतिभा ओळखण्यात आणि पुढे आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

खेळाडूंना सक्षम करण्यासाठी सरकारची 'टॉप्स' योजना क्रीडा परिसंस्थेत परिवर्तन घडवत असल्याचे सांगून पंतप्रधान मोदी यांनी गेल्या दहा वर्षांत भारताने २० आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन केल्याची माहिती दिली. याचाच आधार घेत त्यांनी, आज देश सुधारणेच्या गतीवर स्वार आहे, ज्यात प्रत्येक क्षेत्र आणि प्रत्येक विकासाचे उद्दिष्ट जोडलेले आहे आणि क्रीडा हे त्यापैकीच एक आहे,' असे म्हटले.

पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणातून केंद्र सरकारच्या क्रीडाविषयक विविध योजना आणि खेळांना प्रोत्साहन देणाऱ्या गोष्टींचा आढावा घेतला. गेल्या वर्षी केलेला राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा आणि खेलो भारत धोरण भविष्यात योग्य प्रतिभेला न्याय देईल तसेच क्रीडा संघटनांच्या कारभारात पारदर्शकता आणेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com